रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड शनिवार । दि. १८ जुलै २०२६ । अंक ४२ । पृष्ठे १० । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## एसटी प्रवास महागला

**मुंबई :** राज्य परिवहन प्राधिकरणाने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) १३.५६ टक्के कायमस्वरूपी भाडेवाढीला मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे साध्या बससाठी लागू असलेली १० टक्के हंगामी भाडेवाढ रद्द करण्यात येणार आहे. डिझेल दरवाढ, कर्मचाऱ्यांच्या वेतन-भत्त्यांतील वाढ, वाहनांचे सुटे भाग, टायर व देखभाल खर्चात झालेली वाढ यामुळे एसटीवर आर्थिक ताण निर्माण झाला आहे. राज्यातील ३१ पैकी २२ विभाग तोट्यात असल्याने सेवा टिकवण्यासाठी ही भाडेवाढ आवश्यक असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे.

## राज्यात पाऊस सक्रीय होणार

**मुंबई :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेला मान्सून २२ जुलैनंतर पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता हवामान अभ्यासकांनी व्यक्त केली आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असून, हवेतील वाढलेले बाष्प यामुळे पावसासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. हवामान अभ्यासक अथ्रेय शेट्टी यांच्या माहितीनुसार, २२ ते २५ जुलैदरम्यान राज्यातील अनेक भागांत मध्यम ते चांगल्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. विदर्भ, उत्तर कोकणासह इतर भागांत पावसाचा प्रभाव वाढण्याची चिन्हे आहेत.

## रायगडमधील ३३५, तर राज्यातील १५,३०० ग्रामपंचायतींच्या

# ऑक्टोबरमध्ये निवडणुका?

- २४ जुलैला प्रारूप मतदार याद्या
- १५ एप्रिलची विधानसभा मतदार यादी ग्राह्य

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील तब्बल १५ हजार ३०० ग्रामपंचायतींसह रायगड जिल्ह्यातील ३३५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. राज्य निवडणूक आयोगाने या निवडणुकांसाठी १५ एप्रिल २०२६ रोजीची विधानसभा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतला असून, २४ जुलै रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. हरकती व सूचना निकाली काढल्यानंतर ४ ऑगस्टला अंतिम मतदार यादी जाहीर होणार असून, ऑक्टोबरमध्ये ग्रामपंचायत निवडणुकांचा बिगुल वाजण्याची दाट शक्यता आहे.

२०२४, २०२५ आणि २०२६ मध्ये मुदत संपलेल्या तसेच नव्याने स्थापन झालेल्या ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची प्रक्रिया आता वेगाने सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयोगाने निवडणुकीसाठी १५ एप्रिल २०२६ रोजीची विधानसभा मतदार यादी आधार मानण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे राज्यातील १५ हजार ३०० आणि रायगड जिल्ह्यातील ३३५ ग्रामपंचायतींच्या निवडणुकांची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे.

महाआयटीने विकसित केलेल्या संगणकीय प्रणालीद्वारे प्रभागनिहाय प्रारूप व अंतिम मतदार याद्या तयार करण्यात येणार आहेत. त्यासाठी https://mahasecvoterlist.in ही लिंक राज्य निवडणूक आयोगाने दिली आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांना युजर आयडी व पासवर्ड उपलब्ध करून देण्यात आले असून, तालुकास्तरावर ग्रामपंचायतनिहाय माहिती भरून मतदार याद्या तयार करण्याचे काम सुरू आहे.दरम्यान, काही जिल्ह्यांकडून •> पान ७ वर



### अशी तयार होणार मतदार यादी

राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार २४ जुलै रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर २९ जुलैपर्यंत हरकती व सूचना स्वीकारल्या जाणार आहेत. प्राप्त हरकतींची छाननी करून ४ ऑगस्ट रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. मतदार याद्या तयार करताना संबंधित ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्व पात्र मतदारांचा समावेश झाला आहे की नाही, तसेच हद्दीबाहेरील कोणताही मतदार यादीत समाविष्ट झालेला नाही, याची खातरजमा तहसीलदारांकडून करण्यात येणार आहे.

### मतदार यादीचा कार्यक्रम

- मतदार यादी ग्राह्य धरण्याचा दिनांक : १५ एप्रिल २०२६
- प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी : २४ जुलै २०२६
- हरकती व सूचना दाखल करण्याची अंतिम मुदत : २९ जुलै २०२६
- अंतिम मतदार यादी प्रसिद्ध : ४ ऑगस्ट २०२६
- संभाव्य ग्रामपंचायत निवडणुका : ऑक्टोबर-डिसेंबर २०२६

## एमआयडीसीवर शेकापची धडक

**शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांचा प्रशासनाला इशारा**



● (छायाचित्र : अमोल नाईक)

### चार दिवसांत पाणी द्या, अन्यथा हंडा मोर्चा

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पावसाने धरणे तुडुंब भरली, नद्या-ओढे वाहू लागले; मात्र अलिबाग तालुक्यातील कुरुळ ते खानाव परिसरातील हजारो नागरिकांना अजूनही पाण्याच्या टंचाईचा सामना करावा लागत आहे. महिनाभरापासून कोलमडलेल्या पाणीपुरवठ्यामुळे संतप्त झालेल्या शेतकरी कामगार पक्षाने शुक्रवारी (दि. १७) एमआयडीसीच्या अलिबाग कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना धारेवर धरले. येत्या चार दिवसांत नियमित पाणीपुरवठा सुरू झाला नाही, तर हजारो महिलांसह हंडा मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी दिला आहे.

अलिबाग तालुक्यातील कुरुळ, खानाव आणि परिसरातील अनेक गावांना एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा केला जातो. पावसाळ्यापूर्वी निर्माण झालेली पाणीटंचाई पावसानंतरही कायम असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. जूनच्या अखेरीस मुसळधार पाऊस होऊन धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाला असतानाही अनेक गावांमध्ये पाणीपुरवठा विस्कळीत आहे.

नागरिकांच्या •> पान ७ वर

> “धरणे भरली, पाऊस पडतोय; मग नागरिकांना पिण्याचे पाणी का मिळत नाही? हा प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा कळस आहे. पाणी हा जनतेचा मूलभूत हक्क असून, तो नाकारला जाणार नाही. चार दिवसांत नियमित पाणीपुरवठा सुरू झाला नाही, तर हजारो महिलांसह एमआयडीसी कार्यालयावर हंडा मोर्चा काढून तीव्र जनआंदोलन उभारू. जनतेच्या हक्कासाठी शेकापचा लढा शेवटपर्यंत सुरू राहील.”
>
> – चित्रलेखा पाटील, शेकाप प्रवक्त्या

**वेधक**

### रसायनीत आठवडाभरात दोघांच्या आत्महत्या

**रसायनी :** रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्या आठवडाभरात दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन तरुणांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडल्या आहेत. दोन्ही प्रकरणांमध्ये अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, मृत्यूमागील नेमके कारण शोधण्यासाठी रसायनी पोलीस अधिक तपास करत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खाने-आंबिवली येथील विजय सोनावळे यांच्या घरात भाड्याने राहत असलेले श्रीकांत वासुदेव राय (३०, मूळ रा. पश्चिम बंगाल) यांचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली. त्यांना तातडीने चौक येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले; •> पान ७ वर

### खांब-पालदाड मार्ग दोन दिवस बंद

**रोहा :** रोहा तालुक्यातील खांब-पालदाड अंतर्गत मार्ग डागडुजीच्या कामासाठी १८ व १९ जुलै या दोन दिवसांसाठी वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती मालसई ग्रामपंचायत प्रशासनाने दिली आहे. पालदाड पूल ते उडदवणे गावाच्या हद्दीपर्यंतचा रस्ता पुराच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात खराब झाल्याने ही दुरुस्ती हाती घेण्यात आली आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी या कालावधीत सर्व प्रकारची वाहतूक बंद राहणार असून, वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## जंतर-मंतरवरील आंदोलनाला शेकापचा पाठिंबा

- अतुल म्हात्रेंनी दिल्लीत जाऊन दिले समर्थनपत्र
- केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीला समर्थन



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीतील जंतर-मंतरवर सुरू असलेल्या आंदोलनाला भारतीय शेतकरी कामगार पक्षाने जाहीर पाठिंबा दिला आहे. पक्षाचे महाराष्ट्र राज्य खजिनदार अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी थेट आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला आणि पक्षाच्या वतीने नैतिक पाठिंब्याचे अधिकृत पत्र सुपूर्द केले. या घडामोडीमुळे महाराष्ट्रातून या आंदोलनाला मिळालेल्या राजकीय पाठिंब्याची राष्ट्रीय स्तरावर चर्चा सुरू झाली आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान अतुल नंदकुमार म्हात्रे यांनी कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांची भेट घेतली. यावेळी आंदोलनाला अधिकृत पाठिंबा दर्शविणारे पत्र सुपूर्द करण्यात आले. तसेच आंदोलनात सहभागी असलेले सोनम वांगचुक यांच्याप्रतीही ऐक्य व्यक्त करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांचे •> पान ७ वर

## शिक्षणाधिकारीपदी संजय नाईकडे

**। रायगड । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारीपदी (प्राथमिक) संजय नाईकडे यांनी शुक्रवारी (दि.१७) पदभार स्वीकारला.



शिक्षणाधिकारी ललिता दहितुले यांची पुणे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून बदली झाल्यानंतर संजय नाईकडे यांची रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारीपदी (प्राथमिक) नियुक्ती करण्यात आली आहे.

संजय नाईकडे यांनी पुणे जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. त्यांनी फेब्रुवारी २०२४मध्ये या पदाचा कार्यभार स्वीकारला. त्याआधी ते पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमध्ये प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी •> पान ७ वर

## माणगावच्या विकासाला ब्रेक

- एक खासदार, दोन मंत्री; तरीही कामे ठप्पच!

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यातील महत्त्वाचे शहर म्हणून ओळख असलेल्या माणगावच्या विकासाला गेल्या काही वर्षांत अक्षरशः ब्रेक लागला आहे. कोट्यवधी रुपयांच्या योजना मंजूर असूनही त्या कागदावरच अडकल्या आहेत. शहराचा विकास आराखडा, सांडपाणी योजना, ट्रॉमा हॉस्पिटल, नाट्यगृह, विद्युत उपकेंद्र, शिवसृष्टीसह अनेक प्रकल्प रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. विशेष म्हणजे, एक खासदार आणि राज्यातील दोन मंत्री प्रतिनिधित्व करत असतानाही माणगावला अपेक्षित विकास का मिळत नाही? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी आवश्यक असलेला विकास आराखडा, नगररचना योजना, सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आणि भुयारी गटार योजना अद्याप मंत्रालयाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. दुसरीकडे शिवसृष्टी, नाना-नानी पार्क, सार्वजनिक प्रसाधनगृहे यांसाठी निधी मंजूर असूनही स्थानिक मतभेदांमुळे कामांना सुरुवातच झालेली नाही. परिणामी, निधी असूनही विकासकामे कागदावरच अडकून पडली आहेत. लाखो रुपये खर्चून उभारलेली विद्युत •> पान ७ वर

## केगाव ग्रामपंचायतीत अपहार

**ग्रामविकास अधिकाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश**

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील केगाव ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाला मोठे वळण मिळाले आहे. माजी ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांच्यावर ग्रामनिधीचा अपहार, आर्थिक गैरवापर आणि ग्रामपंचायतीच्या मूळ दस्तऐवजांमध्ये कथित बनावट कागदपत्रांचा समावेश केल्याप्रकरणी तात्काळ फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी उरणचे गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित गटविकास अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा देण्यात आल्याने पंचायत विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

२०१७ मध्ये केगाव •> पान ७ वर

### ग्रामविकास अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त करा

सध्या वैभव पाटील हे खालापूर पंचायत समितीअंतर्गत सुधागड तालुक्यातील नवघर ग्रामपंचायतीत ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्यावरील गंभीर आरोपांचा विचार करून त्यांना तात्काळ कार्यमुक्त करण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी खालापूरच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत. या आदेशामुळे संबंधित विभागातही खळबळ उडाली आहे.




**१२ वर्षांत २ लाख ३ हजार ८६४ रुग्णांना मदत** | **अपघात, प्रसूती ते गंभीर जखमींना वेळेत उपचार**

## ‘१०८’ ठरली जीवनदायिनी!

**प्रमोद जाधव**

**। रायगड ।**

रस्ते अपघात, हृदयविकाराचा झटका, प्रसूती, नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य वैद्यकीय आणीबाणी... अशा संकटाच्या क्षणी रायगडकरांसाठी ‘१०८’ रुग्णवाहिका सेवा अक्षरशः जीवनदायिनी ठरली आहे. गेल्या १२ वर्षांत या सेवेद्वारे तब्बल २ लाख ३ हजार ८६४ रुग्णांना तातडीची वैद्यकीय मदत मिळाली असून, हजारो जीव वाचविण्यात या सेवेची महत्त्वाची भूमिका राहिली आहे.

रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत रायगड जिल्ह्यात २०१४ पासून १०८ रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यात आली. जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांशी समन्वय साधत ही सेवा कार्यरत आहे. बीव्हीजी कंपनीमार्फत या सेवेचे संचालन केले जाते.

जिल्ह्यात सध्या २३ रुग्णवाहिका कार्यरत असून, १०८ क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर काही मिनिटांत रुग्णांपर्यंत पोहोचून प्राथमिक उपचारांसह त्यांना जवळच्या अथवा आवश्यकतेनुसार मोठ्या रुग्णालयात दाखल केले जाते. दररोज सुमारे २०० किलोमीटरचा प्रवास करत या रुग्णवाहिका ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांनाही दिलासा देत आहेत.

या सेवेद्वारे वाहन अपघातातील जखमी, भाजलेले, हृदयविकाराचे रुग्ण, प्रसूती माता, गंभीर जखमी, आत्महत्येचा प्रयत्न केलेले तसेच अन्य वैद्यकीय कारणांमुळे उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना वेळेत मदत मिळत आहे. त्यामुळे १०८ रुग्णवाहिका सेवा जिल्ह्यातील आपत्कालीन आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा आधार बनली आहे.

### १७ नव्या रुग्णवाहिकांची प्रतीक्षा

सध्या कार्यरत असलेल्या अनेक १०८ रुग्णवाहिका दीर्घकाळ वापरामुळे जुन्या झाल्या असून, त्यांना वारंवार तांत्रिक बिघाडांचा सामना करावा लागत आहे. इंजिन, स्टेअरिंग आदी समस्या वाढू लागल्याने जिल्ह्यासाठी १७ नव्या रुग्णवाहिकांची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. या रुग्णवाहिका उपलब्ध झाल्यास आपत्कालीन आरोग्य सेवा अधिक सक्षम आणि गतिमान होणार आहे.



### दृष्टिक्षेपात रुग्णवाहिका सेवा

- वाहन अपघात – ८४५२
- हल्ल्यात जखमी झालेले – ११३०
- हृदयविषयक – २४४९
- भाजलेले – ९२५
- वैद्यकीय मदतीसाठी असणारे – १,३४,६२३
- आत्महत्या करणारे रुग्ण– १५१
- पडलेले – ३५०८
- गंभीर दुखापत – ६९५९
- जखमी कामगार आणि प्रसूती माता– २५,१६५

एकूण – २०३८६४



# ‘नवीन राज्य महिलागृहे उभारावीत’

**मुंबई :** राज्यातील महिलांच्या सुरक्षितता व सक्षमीकरणासाठी आवश्यकतेनुसार नवीन शक्तीसदन आणि राज्य महिलागृहांची स्थापना करण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत. ज्या जिल्ह्यांमध्ये शक्तीसदन किंवा राज्य महिलागृह उपलब्ध नाही, अशा जिल्ह्यांना प्राधान्य देऊन ही सुविधा उभारण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिले. महिलांच्या संरक्षणासाठी केंद्र शासनाची शक्तीसदन योजना आणि राज्य शासनाची राज्य महिलागृह योजना यांचा आढावा घेण्यासाठी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या.


## ई-निविदा सूचना

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**

स्थापत्य विभाग, महावितरण, भांडुप कार्यालय अंतर्गत असणा-या विविध प्रकारच्या स्थापत्य कामांकरिता टी-७१ (२०२४-२५) (२nd call ), टी-७४ (२०२४-२५) (२nd call), टी-१३८ (२०२४-२५) (२nd call ), टी-१४४ (२०२४-२५) (२nd call), टी-१७० (२०२४-२५) (२nd call) आणि टी-१९५ (२०२४-२५) (२nd call ) अशा एकुण **सहा** निवीदा महावितरण कंपनीच्या **www.mahadiscom.in** या e-Tender च्या संकेतस्थाळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निवीदा विक्रीसाठी दि. **१८.०७.२०२६ पासून ते दि. २४.०७.२०२६ @१३.००** वाजेपर्यंत उपलब्ध राहतील व निवीदा भरण्याची अंतिम तारीख दि. **२४.०७.२०२६ ला १५.००** वाजेपर्यंत आहे. निवीदेच्या आवृत्तीत/तारखा/ इ. कोणताही बदल झाल्यास, शुध्दीपत्र यापुढे आमच्या वेबसाईवर प्रकाशित केले जाईल.

(सही)

**कार्यकारी अभियंता (स्था.) स्थापत्य विभाग भांडुप**



## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**रोजगार अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडने रोलिंग स्टॉक कंपोनंट फॅक्ट्री, लोटे, चिपळूण करिता केआरसीएलमध्ये **वॉक इन इंटरव्ह्यूद्वारे** विविध पदांसाठी कराराच्या आधारावर नियुक्तीसाठी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहे:

**अधिसूचना क्रमांक सीओ/पी-आर/12सी/2026, दिनांक 10.07.2026**

| क्र. सं. | पदाचे नाव | यू आर | ईडब्ल्यू एस | ओबीसी | एस सी | एस टी | पदांची एकूण सं. | वॉक इन इंटरव्ह्यूची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ज्युनियर टेक्निकल असिस्टंट / मॅन्युफॅक्चरिंग अँड मेंटेनन्स | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 20.07.2026 |
| 2 | सिनियर टेक्निकल असिस्टंट / मेंटेनन्स | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| 3 | ज्युनियर टेक्निकल असिस्टंट / सिव्हिल | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 21.07.2026 |
| 4 | सिनियर टेक्निकल असिस्टंट / सिव्हिल | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| 5 | ईओटी / फोर्क लिफ्ट / टग ऑपरेटर | 4 | 0 | 1 | 0 | 0 | 5 | 22.07.2026 |
| 6 | टेक्निशियन (फिटर) | 5 | 0 | 2 | 1 | 0 | 8 | |
| 7 | सीएनसी मशीन ऑपरेटर | 6 | 1 | 2 | 1 | 0 | 10 | 23.07.2026 |
| 8 | नॉन-डिस्ट्रक्टिव टेस्टिंग टेक्निशियन | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| 9 | फिटर – मेकॅट्रॉनिक्स मेंटेनन्स | 5 | 0 | 1 | 0 | 0 | 6 | 24.07.2026 |
| 10 | टेक्निशियन (वेल्डर) | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| 11 | सेफ्टी ऑफिसर | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 27.07.2026 |
| | एकूण | 31 | 1 | 6 | 2 | 0 | 40 | |

**टीप** - उमेदवार अधिसूचनेचा तपशील, पात्रता निकष इत्यादी केआरसीएलचे संकेतस्थळ **www.konkanrailway.com** वरील ➔ Recruitment ➔ Current Notification लिंकमध्ये पाहू शकतात आणि त्यानुसार अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक अधिकारी**


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

● **अलिबागपासून जवळच** असलेल्या फार्महाऊसवर राहण्यासाठी जोडप अथवा पुरुष कामगार हवा आहे. त्वरीत संपर्क साधा. संपर्क क्रमांक - ९८२२९३८४४४.

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक १) सौ. अस्मिता महेश भुसारी व २) सौ. सरिता नरेश ऐनकर यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे.

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ५० | ५/६/४ | ०-२१-० | ०-२० |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक १८/०७/२०२६

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस-कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे धोकवडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची अविभाज्य हिश्याची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| धोकवडे ता.अलिबाग | ३०५ | जिरायत ०-१०-६० पो.ख. ०-००-५० एकुण ०-११-१० | २.८१ |

वर वर्णन जमिन मिळकती मध्ये विक्रेता यांचा असणारा अविभक्त हिस्सा सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली अविभाज्य हिश्याची मिळकत ही विद्यमान मालक १) प्रकाश धर्मा पाटील, २) विकास धर्मा पाटील, ३) सुनंदा धर्मा पाटील, ४) मालती रविंद्र वारगावकर, ५) निकीता विनायक पाटील, ६) उषा विनायक पाटील, ७) विवेक विनायक पाटील, यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक- १७/०७/२०२६
मोबा. नं. ९८२२०१७१६१

**ॲड. शलाका शरद पाटील**
ऑफिस - लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं.४ व ५, ब्राम्हण आळी, राम मंदिर समोर, ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमच्या अशिलांच्या वतीने आम्ही खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मालमत्तेसंदर्भात (यापुढे सदर मालमत्ता म्हणून उल्लेखित) श्री. अतुल मारुती घरत व श्री.अर्पितकुमार रजनीकांत दलवाडी (विद्यमान मालक) यांच्या हक्कांची चौकशी करीत आहोत.
कोणाही व्यक्तीचा, यामध्ये व्यक्ती/सोसायटी/ट्रस्ट/कंपनी/एलएलपी/भागीदारीसंस्था यांचा सदर मालमत्ता व /वा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात भार, उत्तराधिकार, हिस्सा, विक्री, अभिहस्तांकन, सामंजस्य करार, विकास हक्क, दायित्वे वा वचनबद्धता वा मागणी, विनिमय, विभाजन, गहाण, देखभाल, भाडेकरार, भाडेकरारांतर्गत, धारणाधिकार, अनुज्ञप्ती, भेट, ताबा, भागीदारी, वहिवाट, न्यास, प्रभार, मृत्यूपश्चात वारसा, गहाण, हमी, सुविधाधिकार, कर्जे, एफएसआय उपभोग, आगाऊ रकमा, निषेधाज्ञा, विचाराधीन विवाद वा अन्य कोणतीही जप्ती वा कोणतेही विधि न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद वा म हसूल प्राधिकारी, वा लवाद याअंतर्गत, पूर्व क्रय वा जुना वहिवाट हक्क वा भार वा अन्य कोणत्याही स्वरूपात कोणताही दावा वा हक्क असल्यास त्यांनी त्या संदर्भात सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून चौदा (१४) दिवसांच्या आत अधोहस्ताक्षरितांना सर्व सहाय्यक दस्तावेजांसमवेत सूचित करावे अन्यथा अशा दाव्याच्या कोणत्याही संदर्भाविना कोणताही भविष्यातील व्यवहार/हस्तांतरण करण्यात येईल आणि अशा व्यक्तींचे दावे, काही असल्यास, ते अधित्यागित समजण्यात येतील व आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत.

**अनुसूची**
**(सदर मालमत्तेचे विवरण)**

पुढील विवरणीत मालमत्तेचा सर्व तो भाग व भूखंड-जमीन मोजमापित ३२ गुंठे (प्लॉट क्र.. जी व प्लॉट क्र..एच) (सदर मालमत्तए) एकूण ३२३३० चौ.मी. क्षेत्रापैकी, सर्व्हे क्र.१७, हिस्सा क्र..६/बी, गाव कालोटे रायाती, तालुका खालापूर, जिल्हा रायगड, महाराष्ट्र.

दिनांक - १८ जुलै, २०२६

**ॲड.जीनल शेख-भागीदार**
अर्श लीगल
ए-२०४, महेश कॉम्प्लेक्स, प्लॉट क्र.३७, सेक्टर-१५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई -४०० ६१४.


## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. :- 7000040322** **Tender No. : EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-25/2026-2027** RFx e-tender for replacement of LA surge counters at 220kV Apta & Wadkhal Substation under EHV (O&M) Division Panvel...3rd **call** **Tender amount Rs. 7,44,865/-, EMD amount Rs. 7,449/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.07.2026, 18:00 Hrs. to 27.07.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 27.07.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **28.07.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DN. PANVEL**



## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO — Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. :- 7000040774** **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-26/2026-2027** RFx e-tender for work of repairing of 22/33kV Current Transformer/ Potential Transformer at various Substations under EHV (O&M) Division Panvel. **Tender amount Limited to Rs. 7,00,000/-, EMD amount Rs. 7,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.07.2026, 18:00 Hrs. to 01.08.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.08.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.08.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**E.H.V. (O&M) DN. PANVEL**


## जाहीर नोटीसला हरकत

तमाम लोकांना या जाहीर हरकतीने कळविण्यात येते की, दैनिक कृषीवल या वर्तमानपत्रामध्ये शनिवार दि. ११/०७/२०२६ रोजी पान नं. २ वर मौजे मानकुळे, ता. अलिबाग येथील भूमापन क्र. ६२/१/अ, क्षेत्र ०-६२-०० हे. आर., आकार ७.५६ रू. पै. व भूमापन क्र. ६३, क्षेत्र ०२-१८-५० हे.आर. पैकी क्षेत्र ०१-८२-०० हे. आर., आकार २५९४ रू. पै. ही मिळकत १ श्री. गजानन शंकर पाटील २. महेश शंकर पाटील, ३. गुलाब बबन पाटील, ४. सुनिता रामचंद्र पाटील, ५. आनंदी पोसू पाटील, ६. आत्माराम पोसू पाटील, ७. सिंधू प्रमोद म्हात्रे, ८. संध्या मारूती म्हात्रे, ९. सुजाता मारूती पाटील, १०. राजेश मारुती पाटील, ११. स्नेहल मारूती पाटील, १२. जगन्नाथ महादेव पाटील, १३. विठ्ठल महादेव पाटील, १४. नवनाथ महादेव पाटील, १५. प्रविण महादेव पाटील, १६. कुंदा समाधान पाटील, १७. तेजस कृष्णा पाटील, १८. संगिता सुधीर मोरे, १९. चित्रा किरण मुदलीयार, २०. श्रीकांत हरिश्चंद्र पाटील, २१. दर्शना मिलींद पाटील, २२. स्वप्ना सुभाष पाटील, २३. कविता मिलींद पाटील. २४. ममता हरेश ठाकूर, या विद्यमान मालकांमार्फत ॲड. समिक्षा सिद्धार्थ शेंबेकर, रा. जिल्हा न्यायालय रायगड, मु. लोणारे, पो. थळ, ता. अलिबाग जि. रायगड ४०२ २०७, यांचे अशिल खरेदी करणार असल्याबाबत त्यांनी जाहिर नोटीस दिली आहे. त्या नोटीशीला आमचे अशिल श्री. अनुरुद्र बळीराम पाटील, रा. अल्टा विस्टा, एस आर ए बिल्डींग, रूम नं. ९२०, नववा मजला, डी. विंग, लालडोंगर, चेंबूर (पु) मुंबई ४०००७० व श्री. रामकृष्ण महादेव म्हात्रे, रा. बेलपाडा, पो. हाशिवरे ता. अलिबाग, जि. रायगड यांची सक्त हरकत आहे. सदरच्या मिळकती या पुर्वी कुंडलिक बळी पाटील यांच्या मालकीच्या होत्या. त्यांना दोन पत्नी होत्या. पहिल्या पत्नीचे नाव भीमा तर दूसऱ्या पत्नीचे नाव भागी असे होते. आमचे अशिल हे पहिल्या पत्नीचे वारस आहेत. तर दुसऱ्या पत्नीचे वारसांची नावे विद्यमान मालक म्हणून ७/१२ वर दिलेली दिसत आहेत. कुंडलिक बळी पाटील हे मयत झाले तेव्हा फेरफार नोंद नं.१३२९ प्रमाणे त्यांच्या सर्व वारसांची नोंद न करता फक्त दुसऱ्या पत्नीच्या तीनच मुलांची नावे दाखल करण्यात आली. मात्र पहिल्या पत्नीचा मुलगा विठ्ठल याचे नाव दाखल केले गेले नाही. त्यामुळे ७/१२ कडे मालक म्हणून आमचे अशिलांची नावे आलेली दिसत नाहीत. ही बाब आमचे अशिलांना आता नुकतीच कळली असून आमचे अशिलांचा वरील मिळकतींमध्ये देखील कायदेशीर हिस्सा आहे. त्यामुळे ॲड. समिक्षा शेंबेकर यांचे अशिलांनी फक्त ७/१२ वर नावे असलेल्या इसमांशी खरेदीची बोलणी न करता आमचे अशिलांशी देखील बोलणी करावीत कारण सदर मिळकतींमध्ये आमचे अशिलांचा देखील हिस्सा आहे. ॲड. समिक्षा शेंबेकर यांचे अशिल आमचे अशिलांशी मिळकत विकत घेणे बाबत बोलणी करणार असतील तर विठ्ठल कुंडलिक पाटील यांच्या सर्व वारसांची माहिती आमचे अशिल देतील. ॲड. समिक्षा शेंबेकर यांनी त्यांच्या नोटीसमध्ये मिळकतींच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व विक्री व्यवहारास कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकरीता जाहिर नोटीस प्रसिद्ध केल्याबाबत कळविले आहे, त्याप्रमाणे आमचे अशिल कळवत आहेत. आमचे अशिलांचे अपरोक्ष सदर मिळकतीबाबत कोणीही व्यवहार करू नये, त्याला आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. त्यामुळे या मिळकतीच्या हस्तांतरणाचा व्यवहार कोणीही करू नये याची या जाहीर हरकतीद्वारे सर्वानी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. १७/०७/२०२६

सही /-
**ॲड. शिरीष पद्माकर लेले**
श्रीकृपा, भाऊसाहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे कुरुंग ता. कर्जत जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल कैलास शंकर म्हात्रे यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांचेकडून कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे.

| गावांचे नांव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| कुरुंग | १७/५ | १-२९-० | ०.५५ |
| | १७/७ | ०-२५-० | ०.१० |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून चौदा (१४) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वास कळावे.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभातदर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं १०१,
ममदापुर रोड, नेरळ ता. कर्जत, जि. रायगड
फोन नं. ९८८१२७९८१७

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, मुंबई
जुने सचिवालय, २ रा मजला, फोर्ट, मुंबई - ४०००३२
दूरध्वनी क्रमांक- २२८४४६३४, २२८४३१२१ ईमेल - mrtregistrarmum@gmail.com /registrarmrt@yahoo.in

क्र.सदस्य (न्यायिक/टेनन्सी/रिव्ही/रायगड/एल-४९०/२५
दिनांक १०/०७/२०२६

प्रति,
श्री. मुकुंद श्रीराम मेढी,
रा. खानबेवाडी, ता. खालापूर, जि. रायगड.

विरुद्ध

८. उषा ज्ञानेश्वर गावडे,
मु. जांभीवली, ता. कर्जत, जि. रायगड

**विषयः- सुनावणी नोटीसीबाबत**

वरील नांव धारण करणारा, अर्जदार यांनी उपविभागीय अधिकारी, कर्जत, जि. रायगड यांचेकडील टेनन्सी अपील क्र. ६१/२०२२ दि. ०७/०३/२०२४ च्या आदेशाबाबत केलेल्या उपनिर्दिष्ट अर्जाची सुनावणी दि.०५/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता, मा. सदस्य (न्यायिक) महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई न्यायाधिकरणापुढे खालील पत्यावर करण्याचे निश्चित केले आहे याची समज घ्यावी.

पुढील सुनावणी तारखेस तुम्ही जातीने किंवा प्राधिकृत प्रतिनिधी किंवा वकिला मार्फत न्यायाधिकरणापुढे हजर झाला नाहीत, तर न्यायाधिकरण सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी करील व त्या संबंधात योग्य तो आदेश दईल.

सही/-
**प्रबंधक**
**महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई**

**सुनावणीचे ठिकाण**
२/- महाराष्ट्र महसूल न्यायधिकरण, मुंबई यांचे कार्यालय, जुने सचिवालय, विस्तार इमारत २ रा मजला, फोर्ट, मुंबई-३२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे केळवणे, ता. पनवेल , जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ५३/४ | एकूण क्षेत्र ०-२३-८० हे.आर | ०.१९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :-१८/०७/२०२६

**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## PUBLIC NOTICE

General Public is made aware that my client is intending to purchase the immovable property more particularly described in the schedule hereunder written, alongwith the structures if any standing thereon from 1] Mrs. Jacintha J. Divyanesan, 2] Mrs. Hemavathi Irudhaya Rajan, both R/at. R/at. Johnn Divyanesan, A-101, Nirman Cottege, Yari Road, Next to Vimala Hospital, Andheri (W), Mumbai 400 061,

Any person having any claim, right, title or interest in respect of the said property or any part thereof including by way of sale, conveyance, assignment, transfer, exchange, gift, mortgage, lien, lease, sub-lease, charge, trust, maintenance, inheritance, easement, possession, share or otherwise or any other right or interest whatsoever, are hereby require to make same known in writing to the undersigned at the address given below within 14 days from the date of publication of this notice together with copies of all the documents on the basis of which such a claims are made and obtain valid acknowledgement thereof, failing which my client shall proceed without any reference to such claim and the same, if any, will be considered as waived.

**SCHEDULE**

All that pieces of land bearing Survey No. 9/4/2, H.No. 0, admeasuring 0-48-60 H.R., P.K.0-02-60 H.R. Total 0-51-20 H.R. Assessment Rs.2.31 situated at Village Gunjish, Tal. Alibag, District Raigad.

Dated: 16/07/2026

**ADV. VIVEK RAMESH SALVI**
Opp. Sub Registrar, Alibag, Shop No.5,
Tal. Alibag, Dist. Raigad

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल श्रीमती गीता संजीव खंडेलवाल, रा.५३, धनिष्ठा, तारांगण टॉवर्स को.ऑ.हौ.सोसायटी, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, कोरम मॉल शेजारी, समता नगर, ठाणे (प.), जे के ग्राम, ४००६०६, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे पाथरज, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत.**

| स.नं./हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ५०/५/६/१ | ०.२९.६० पो.ख. ०.०१.६० एकुण ०.३१.२० | ०.२९ | श्रीमती अस्मिता महेश भुसारी व श्रीमती सरिता नरेश ऐनकर. |

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या १४ (चौदा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- १८/०७/२०२६.

सही /-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## जाहीर नोटीस

दिवाणी अपील क्र. २४४/२०१३
नि : ७७/ड

**अलिबाग येथील मे. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रायगड यांचे कोर्टात**

नारायण सिताराम मोकल तर्फे वारस — अपेलंट
विरूद्ध
मीना पोसु धुमाळ, वगैरे — रेस्पाँडंटस्

प्रति,

प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/२/१ श्री. कर्तव्य अनिल मोकल, प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/२/२ श्री. स्वागत अनिल मोकल, प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/२/३ श्रीमती किमया अनिल मोकल, प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/३/३ श्रीमती कामिनी जयेश ठाकुर, प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/३/४ श्रीमती भाग्यश्री सुभाष तांडेल, प्रस्तावित रेस्पाँडंट क्र.८/३/६ श्रीमती अमृता अनिल पाटील, सर्व रा.चिंचवली, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड.

ज्याअर्थी नारायण सिताराम मोकल तर्फे वारस श्री.विवेकानंद नारायण मोकल यांनी या न्यायालयात वर नमुद दिवाणी अपील दाखल केले असुन त्या कामी तुमचे वर नमुद पत्त्यावर में. कोर्टामार्फत अपिलाची नोटीस पाठवली असता तुम्ही सदरील ठिकाणी उपस्थित नसल्याचे लिहून आल्याने तुम्हास या जाहीर नोटीसद्वारे कळवण्यात येते की, तुम्ही स्वतः अगर वकिलांमार्फत दिनांक १७/०८/२०२६ रोजी या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता हजर होऊन सदरील अपीलाचे कामी तुम्हांस रेस्पाँडंटपणात का सामील करून नये याबाबत तुमचे लेखी म्हणणे सादर करावे. तुम्ही गैरहजर राहील्यास सदरील अपीलाचे कामी पुढील योग्य ते आदेश तुमच्या अनुपस्थितीत करण्यात येतील हे कळावे.

आज दिनांक १६/०७/२६ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

सही/-
**कनिष्ठ लिपिक,**
**जिल्हा न्यायालय,**
**रायगड-अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय,**
**रायगड-अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही सौ. शर्मिला दिपक दत्ता यांस सदरील मिळकतीचे मालक उर्मिल बाली यांसकडुन दिनांक ०९ जून २०१६ रोजीचे बक्षिसपत्राने मिळालेली असून सदरील मिळकत त्यांचेकडून माझे अशिल यांनी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद किंवा सौ. शर्मिला दिपक दत्ता यांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे तिवरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत**

| सर्व्हे नं./हिस्सा नं./प्लॉट नं | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|
| | आर.चौ.मी. | रुपये | पैसे |
| ९/१/अ//७/अ/२० | ४-४१-२७ | ४४ | १३ |
| ९/१/अ//७/अ/२१ | ३-८३-२१ | ३८ | ३३ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :-१८/०७/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहीला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेलः adv.jayeshmhase@gmail.com

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्रीकांत आत्माराम निकम यांचेकडून कायम स्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बागमळा, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| बागमळा ता.अलिबाग | १२१/९ | ०-१२-९० पो.ख.०-०३-३० एकुण ०-१६-२० | ०.३३ |

दिनांक : १८/०७/२०२६
अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ताः फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची जमिन मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमान मालक/कब्जेदार यांचेकडून सदर मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-मोठे वढाव, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| दामोदर नारायण पाटील | ३२९ | - | ०-५२.३० पैकी ०-२०.०० | ६.५० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न-वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु. हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील दामोदर नारायण पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १८/०७/२०२६

**श्री.तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को. ऑप हौ. सोसा. लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

# जनसामान्यांची माऊली : स्व. नमिता नाईक



प्रमोद जाधव

अगदी कमी कालावधीत सामाजिक, राजकीय, क्रीडा क्षेत्रात आपली स्वतःची ओळख निर्माण करणाऱ्या स्व. नमिता नाईक यांचे १८ जूलै २०१५ मध्ये अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने संपूर्ण शहर शोकाकुळ वातावरणात बुडाला होता. जनसामान्यांसाठी लढणारी, सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारी माऊली म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीत भूमिका बजावली. त्यांच्या ११ व्या स्मृती दिनानिमित्त कार्याचा घेतलेला आढावा.

स्व. नमिता प्रशांत नाईक म्हणजे एक रणरागिणी होत्या. शेतकरी कामगार पक्षाचा लाल बावटा शहरातील घराघरात पोहोचविण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. अलिबाग नगरपरिषदेच्या नगरसेविकापासून ते नगराध्यक्ष म्हणून पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी खंबीरपणे सांभाळली. शहरातील स्वच्छता, बेरोजगार तरुणांना रोजगार, महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा तसेच शहरातील खेळाडू निर्माण व्हावे, यासाठी कायमच त्यांचा पुढाकार राहिला. अलिबाग शहरामध्ये अद्ययावत असे क्रीडा संकुल असावे, ही त्यांची संकल्पना होती. परंतु, त्यांच्या पश्चात त्यांचे पती अलिबाग नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांनी पुर्ण केली. आज अलिबाग शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी श्रीबागमध्ये सुसज्ज अशा सोयी-सुविधांयुक्त असे क्रीडा संकुल उभे आहे. अलिबाग शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यामध्येही त्यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. अलिबाग शहरात अद्ययावत अशी मासळी व भाजी बाजारपेठ उभी राहावी, यासाठी त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत प्रचंड मेहनत घेतली होती. 'स्वच्छ अलिबाग व सुंदर अलिबाग' ठेवण्यासाठी त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबविण्यावर भर दिला होता.

अलिबागकरांच्या मनातील अस्मिता जागी करणाऱ्यामध्ये स्व. नमिता नाईक यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. त्यांनी महिला व बालकल्याण सभापतीपदाची धुरादेखील यशस्वीपणे सांभाळत, अलिबागच्या विकासात मोलाचे योगदान दिले. प्रशासनावर एक वेगळी पक्कड त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत निर्माण करून ठेवली होती. गोरगरीबांच्या मदतीला धावून जाणाऱ्या म्हणून एक सक्षम महिला नेत्या होत्या. एखादा प्रश्न हाती घेतल्यावर त्याची सोडवणूक झाल्याशिवाय त्या कधीच गप्प बसल्या नाहीत. शहराच्या हितासाठी झटणाऱ्या झुंजार नेतृत्व होत्या. शहरातील कोणतीही समस्या तात्काळ सोडविण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा होता. शहरात एकोपा राखण्यामध्येही त्यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. समाजातील तळागाळातील घटकांच्या न्याय्य हक्कासाठी लढणाऱ्या त्या एक नेत्या होत्या. अलिबागमधील महिला मंडळे, बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे दिवाळीनिमित्त प्रदर्शन भरविणे, महिलांसाठी निरनिराळी शिबीरे घेणे, मुंबईच्या धर्तीवर अलिबागमध्ये भव्यदिव्य असे महोत्सव भरवण्यामध्ये त्यांची कामगिरी मोलाची राहिली आहे. अभ्यासू व्यक्तिमत्त्व असलेल्या नमिता नाईक यांनी नगराध्यक्ष म्हणून कार्यरत असताना प्रत्येक नागरिकांसोबत हसतमुखाने संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्याचे उल्लेखनीय काम केले आहे. अलिबागमध्ये जन्मलेल्या, शालेय व महाविद्यालयीन बी.ए.पर्यंत अलिबागमध्ये शिक्षण घेतलेल्या नमिता नाईक यांनी नगराध्यक्षपदाच्या संधीचे सोने जनतेच्या हितासाठी करुन दाखविले.

''अलिबागसे आया है क्या'' या संवादाविरोधात त्यांनी आक्रमक होत अलिबागमधील सर्वपक्षीयांना एकत्रित करुन लढा उभारला होता. त्यासाठी अनेक उपक्रम राबविले होते. या उपक्रमांना रायगड जिल्ह्यातून देखील चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्यासाठी त्यांनी न्यायालयीन लढादेखील दिला होता. अलिबागकरांसाठी झटणाऱ्या ताई अर्थात नमिता नाईक यांच्या निधनाने मोठा धक्का बसला. १८ जुलै २०१५ या दिवशी त्यांचे निधन झाले. स्व. नमिता नाईक यांच्या कार्याची आठवण आजही प्रत्येकाच्या स्मरणात राहणारी आहे. त्यांना भावपूर्ण आदरांजली आणि श्रध्दांजली! ●

## निवडक



### समुद्रकिनारी प्लास्टिकच्या बाटल्या

**आगरदांडा :** मुरूड समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याला पिवळसर गाळ आल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. याशिवाय किनाऱ्यावर मोठ्या प्रमाणात प्लास्टिकच्या पाण्याच्या बाटल्या, कचरा आणि इतर टाकाऊ वस्तूंचा साठा झाल्याचे चित्र दिसून येत आहे. समुद्रात वाहून आलेला कचरा आणि प्रदूषणामुळे समुद्राचे सौंदर्य धोक्यात आले असून पर्यावरणावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. मुरुड पर्यटन क्षेत्र असून या ठिकाणी स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारा असून या ठिकाणी रोज शेकडो पर्यटक ये-जा करित असतात. तरी आपल्या पर्यटन क्षेत्रावर कोणताही परिणाम होऊ नये त्याकरिता नागरिकांनी प्लास्टिकचा वापर कमी करावे तसेच कचरा समुद्रात किंवा किनाऱ्यावर न टाकु नये असे आवाहन मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी केले आहे.

### 'व्हॉट्सॲप ॲपवर वीज तक्रारी नोंदवा'

**तळा :** सध्या वीजपुरवठा सुरळीत सुरू असला तरी मोबाईल नेटवर्कमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे वीज ग्राहकांनी आपल्या तक्रारी व्हॉट्सप तसेच महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲपद्वारे नोंदवाव्यात असे आवाहन महावितरणने केले आहे. महावितरणची



व्हॉट्सॲप सेवा सुरू असून, वीज बिलाशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावरून ९१६७७७७७९१ या क्रमांकावर कळ असा संदेश पाठविल्यानंतर तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. स्मार्ट मीटरधारक ग्राहकांनी M-H-VIDYUT (महाविद्युत) ॲप डाउनलोड करून वीज बिलाशी लिंक असलेल्या मोबाईल क्रमांकावर लॉगिन केल्यानंतर तेथूनही तक्रार नोंदवू शकतात. तसेच M-H-VITR-N ॲपद्वारेही वीजपुरवठ्यासंदर्भातील तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध आहे. मोबाईल नेटवर्कमधील अडचणी लक्षात घेता, ग्राहकांनी दूरध्वनीऐवजी ऑनलाईन सुविधांचा वापर करून तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन महावितरण प्रशासनाने केले आहे.

### बीएलओच्या कामामुळे शिक्षक आक्रमक

**म्हसळा :** मतदार यादी विशेष पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेंतर्गत बीएलओ म्हणून काम करणाऱ्या म्हसळा तालुक्यातील शिक्षकांनी अतिरिक्त कामाच्या वाढत्या ताणाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मतदार यादी पुनरिक्षणाला विरोध नसला, तरी या कामाच्या नावाखाली होणारा मानसिक त्रास थांबवावा आणि शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी मोकळे करावे, अशी मागणी शिक्षकांनी पंचायत समितीचे सभापती बबन मनवे यांच्याकडे केली. शिक्षकांनी सांगितले की, बीएलओ म्हणून सलग सहा दिवस



क्षेत्रीय काम करावे लागत असून साप्ताहिक सुट्टीच्या दिवशीही काम करण्यास भाग पाडले जात आहे. शाळेतील अध्यापन, कुटुंब आणि इतर जबाबदाऱ्या सांभाळताना हा अतिरिक्त ताण सहन करणे कठीण होत असल्याने मानसिक आणि शारीरिक त्रास वाढत आहे. महसूल विभागाकडून शाळेचे काम पूर्ण झाल्यानंतर दुपारी एसआयआरचे काम करण्याच्या सूचना दिल्या जात आहेत. याशिवाय शाळेच्या वेळेत तहसील कार्यालय व नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांचे वारंवार फोन येत असल्याने अध्यापनात व्यत्यय येत आहे. 'आम्हाला मानसिक त्रास देऊ नका, मुलांना शिकवू द्या', अशी आर्त हाक शिक्षकांनी यावेळी दिली. यावर सभापती बबन मनवे यांनी शिक्षकांच्या समस्या तहसीलदारांसमोर मांडून योग्य तो मार्ग काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी उपसभापती लहू म्हात्रे तसेच तालुक्यातील अनेक शिक्षक उपस्थित होते.

### पनवेलच्या प्रवेशद्वारावर बेघरांचे वास्तव

**खांदा कॉलनी :** पनवेल शहराच्या प्रवेशद्वारावरच बेघर नागरिकांचे वास्तव पाहायला मिळत आहे. पनवेल रेल्वे स्थानकाबाहेर तसेच एसटी डेपोसमोरील उड्डाणपुलाखाली अनेक बेघर नागरिक दिवस-रात्र झोपलेल्या अवस्थेत दिसून येतात. दररोज हजारो प्रवासी पनवेल रेल्वे स्थानकातून ये-जा करतात. स्थानकाबाहेर पडताच बेघर नागरिकांचे हे चित्र प्रथमदर्शनी पाहायला मिळत असल्याने शहराच्या स्मार्ट सिटीच्या दाव्यावरच प्रश्न उपस्थित होत आहेत. पनवेलपासून काही अंतरावर नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाले असून, मोठ्या प्रमाणात देशांतर्गत प्रवाशांची ये-जा सुरू आहे. होण्याची शक्यता असल्याने परदेशी प्रवाशांची संख्याही वाढणार आहे. अशा वेळी पनवेल हे प्रमुख प्रवेशद्वार असल्याने शहराची पहिली छाप अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# स्मार्ट बसस्टॉपवर कचऱ्याचे साम्राज्य

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेने प्रवाशांना आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शहरातील विविध भागांत अत्याधुनिक स्मार्ट बसस्टॉप उभारले आहेत. प्रत्येक बसस्टॉपसाठी सुमारे २७ लाख रुपयांचा खर्च करण्यात आल्याची माहिती असून, या बसस्टॉपमध्ये सौरऊर्जेवर चालणारी प्रकाशयोजना, सीसीटीव्ही कॅमेरे, पंखे तसेच इतर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.



मात्र, या स्मार्ट बसस्टॉपच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र समोर आले आहे. बसस्टॉपलगत बसविण्यात आलेले कचरा संकलन बॉक्स अनेक ठिकाणी तुडुंब भरलेले असून, वेळेवर कचरा उचलला जात नसल्याने कचरा बाहेर साचत आहे. परिणामी दुर्गंधी पसरत असून प्रवाशांना अस्वच्छ वातावरणात बसावे व उभे राहावे लागत आहे. लाखो रुपये खर्चून उभारलेल्या या बसस्टॉपची शोभा कचऱ्यामुळे मलिन होत असून, नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे. आधुनिक सुविधा उभारण्याबरोबरच त्यांची नियमित स्वच्छता व देखभाल करणेही तितकेच आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. भरलेले कचरा बॉक्स तातडीने रिकामे करून बसस्टॉप परिसराची नियमित स्वच्छता करण्याची मागणी प्रवासी व स्थानिक नागरिकांनी केली आहे. अन्यथा सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

## घरफोडीत सोन्याचे दागिने लंपास

**पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत टिळक रोड परिसरातील एका घरात घरफोडी करून अज्ञात चोरट्याने तब्बल १० लाख ७५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. फिर्यादी भारती कदम (वय ५३) यांच्या राहत्या घरात १४ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास चोरी झाली. फिर्यादी घर बंद करून बाहेर गेले असताना अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून गेली. चंद्रकांत मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहेत.



## सखोल पुनरीक्षण मोहिमेला प्रतिसाद

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमाला खांदा वसाहत येथील आगरी शाळेत नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि सर्वसमावेशक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून, मतदार यादीत नाव असणे ही प्रत्येक पात्र नागरिकाची जबाबदारी असल्याचे यावेळी सांगण्यात येत आहे.

सोसायट्यांमधून मोठ्या संख्येने नागरिक एसआयआर मॅपिंगसाठी आगरी शाळेत येत आहेत. केंद्रावर नियुक्त बीएलओ नागरिकांना आवश्यक माहिती देत अर्ज भरणे, कागदपत्रांची पडताळणी करणे, नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती प्रक्रिया समजावून सांगण्याचे काम अत्यंत नियोजनबद्ध आणि आदर्शवत पद्धतीने करत आहेत.

## वंचित वाड्यांना मूलभूत नागरी सुविधाची मागणी

**| पेण | प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील विविध वंचित वाड्या-वस्त्यांमध्ये आजही मूलभूत नागरी सुविधांचा अभाव असल्याचा मुद्दा उपस्थित करत वंचित बहुजन आघाडीच्या पेण तालुका शाखेच्या वतीने रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

वंचित बहुजन आघाडीचे पेण तालुका अध्यक्ष सुनील प्रल्हाद धामणकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, पेण तालुक्यात मोठ्या प्रमाणावर वंचित समाज वास्तव्यास असून अनेक वर्षांपासून ते रस्ते, शुद्ध पिण्याचे पाणी, वीज, लाईट, सांडपाणी व्यवस्थापन, स्मशानभूमी, आरोग्य सुविधा अशा अत्यावश्यक नागरी सुविधांपासून वंचित आहेत. त्यामुळे या भागातील नागरिकांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या सर्व मूलभूत सुविधांची कामे जिल्हा परिषदेमार्फत समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून हाती घेण्यात यावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पी.एन.पी. महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

कवी कालिदास दिनाचे औचित्य साधून मराठी भाषा विभागातर्फे (दि.१५) जुलै रोजी मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. उत्तरा खाडिलकर, महाविद्यालयाचे प्रशासकीय सल्लागार गबाजी गीते, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे आदी मान्यवर उपस्थित होते.



सदर कार्यक्रमाची सुरुवात मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनाने करण्यात आली. यानंतर कला व मराठी विभाग प्रमुख डॉ. नम्रता पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकेमध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाचा थोडक्यात आढावा घेऊन मराठी वाङ्मय मंडळाचे प्रमुख उद्दिष्ट अधोरेखित केले. प्रमुख अतिथी डॉ. उत्तरा खाडीलकर यांनी महाकवी कालिदास यांचा जीवनपट उलगडत, कालिदासांच्या कलाकृतींवर भाष्य केले. तसेच मराठी विभागात होत असलेल्या कार्यक्रमाबद्दल कौतुक करीत इतर पर्याय देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी मार्गदर्शनही केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय वक्तव्यामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओमकार पोटे यांनी मराठी विभागातील विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतुक करीत मराठी विभाग नेहमीच दर्जेदार कार्यक्रम राबवीत असतो असा विश्वास व्यक्त केला. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागातील प्रा. रूपाली पाटील यांनी केले तर कार्यक्रमाचे सर्व नियोजन व कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठी विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी मोलाचे सहकार्य केले.

## हुंडाप्रकरणी चौघांविरोधात गुन्हा

**पनवेल :** महिलेकडून हुंडा मागून तिला शारीरिक आणि मानसिक त्रास दिल्याप्रकरणी पती, सासू, सासरे, नणंद यांच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी यांनी समुपदेशन साठी पोलीस ठाण्यात अर्ज केला होता. मात्र, समुपदेशन अयशस्वी झाल्याने त्यांनी पोलीस ठाण्यात चौघाविरोधात गुन्हा दाखल केला. फिर्यादीला हुंडा तसेच घरातील किरकोळ कारणावरून वाद घालून दमदाटी तसेच शिवीगाळ करून मानसिक आणि शारीरिक त्रास दिला.

# उंबरणेवाडीची फरफट कायम

- प्रसूतीनंतर तान्हुल्यासह झोळीतून प्रवास
- रस्त्याअभावी ग्रामस्थांची जीवघेणी कसरत

**| खोपोली | प्रतिनिधी |**

या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे... या सुप्रसिद्ध भावगीतातील आशय जणू खालापूर तालुक्यातील उंबरणेवाडीच्या ग्रामस्थांच्या जगण्यातूनच प्रत्ययास येतो. प्रशासनाने मूलभूत सुविधा दिल्या नसल्या, तरी आम्ही आमच्या हिंमतीवर जगतो; तुमचा विकास आणि खोटी आश्वासने नकोत, अशीच भावना ग्रामस्थांनी आपल्या कृतीतून व्यक्त केली आहे.

खालापूर तालुक्यातील दुर्गम उंबरणेवाडीतील गर्भवती महिला मनीषा पारधी हिला काही दिवसांपूर्वी प्रसूतीसाठी ग्रामस्थांनी झोळीतून तब्बल सहा किलोमीटर पायी वाहून आंबेवाडीपर्यंत आणले होते. त्यानंतर वाहनाने १४ किलोमीटर अंतरावरील चौक ग्रामीण रुग्णालयात दाखल



करण्यात आले. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त झाला आणि विकासाच्या दाव्यांवर प्रचश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले.

मात्र, प्रसूतीनंतर रुग्णालयातून सुट्टी मिळाल्यावर मनीषा पारधी यांना त्यांच्या तान्हुल्या बाळासह पुन्हा एकदा झोळीतूनच सहा किलोमीटरचा प्रवास करून उंबरणेवाडीत जावे लागले. ज्या मार्गाने त्या गर्भवती असताना रुग्णालयात आणल्या गेल्या, त्याच मार्गाने आता नवजात बाळाला घेऊन परतावे लागल्याने प्रशासनाच्या उदासीनतेवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

सहा दिवस उलटूनही परिस्थितीत कोणताही बदल झाला नसल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. उरण विधानसभा मतदारसंघातील या आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना अखेर रस्ता कधी मिळणार, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून रस्त्याची मागणी केली असून, केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे व्हायरल व्हिडिओनंतरही प्रशासन जागे झाले नाही का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

उंबरणेवाडीतील ही घटना केवळ एका महिलेची नाही, तर दुर्गम भागातील विकासाच्या वास्तवाचे विदारक चित्र असल्याची भावना व्यक्त होत आहे.

**संतप्त ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा | पर्यायी सुरक्षित रस्त्यांची मागणी**

# रोहा उड्डाणपुलाचे काम पुन्हा सुरु

**| चणेरा | प्रतिनिधी |**

रोहा रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात रेल्वे प्रशासनाने आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनांचा भंग करत पुन्हा कामाला सुरुवात केल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. पर्यायी रस्ता पूर्णपणे सुरक्षित व वाहतुकीस योग्य केल्याशिवाय उड्डाणपुलाचे काम सुरू करू नये, अशी स्पष्ट मागणी आंदोलनकर्त्यांनी केली होती. मात्र, आंदोलकांची पाठ फिरताच रेल्वे प्रशासनाने कामाला अधिक वेग दिल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



काही दिवसांपूर्वी रोहा रेल्वे उड्डाणपुलाजवळ झालेल्या भीषण अपघातात संकेत कोतवाल (वय.३२) या तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आणि नागरिकांनी रस्ता रोको आंदोलन करत प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती.

आंदोलकांनी उड्डाणपूल प्रकल्पाचे अभियंता ओमकार म्हात्रे यांना इशारा दिला होता की, जोपर्यंत पर्यायी रस्ता पूर्णपणे सुरक्षित आणि वाहतुकीस योग्य केला जात नाही, तोपर्यंत उड्डाणपुलाचे काम सुरू करू नये, अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली होती. त्यावेळी प्रशासनाकडून सकारात्मक आश्वासन देण्यात आल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला होता.

मात्र, या आश्वासनांची अंमलबजावणी न करता रेल्वे प्रशासनाने उड्डाणपुलाच्या कामाला पुन्हा अधिक जोमाने सुरुवात केल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आंदोलकांच्या मागण्यांना केराची टोपली दाखवत प्रशासनाने काम सुरू केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. अजून किती अपघातांची वाट पाहत आहात? अशा संतप्त प्रतिक्रिया आंदोलनकर्त्यांकडून व्यक्त होत आहेत. त्यामुळे रेल्वे प्रशासन, संबंधित कंत्राटदार आणि प्रकल्प अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांचे म्हणणे आहे की, पर्यायी रस्ता धोकादायक अवस्थेत आहे. अशा परिस्थितीत या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

**वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे**

आंदोलनादरम्यान दिलेल्या आश्वासनांची तातडीने पूर्तता करावी. पर्यायी रस्ता पूर्णपणे दुरुस्त व सुरक्षित केल्यानंतरच उड्डाणपुलाचे काम सुरू करावी अशी मागणी ग्रामस्थांनी पुन्हा एकदा केली आहे. अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिल्याने रोह्यातील वातावरण पुन्हा तापण्याची चिन्हे दिसत आहेत.



## रामरक्षा आंदोलनात भाजप विरोधात घोषणाबाजी

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुका व शहराच्या वतीने माजी आ. मनोहर भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी आयोजित करण्यात आलेल्या रामरक्षा आंदोलन व महाआरती आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी संतोष ठाकूर, बी. एन. डाकी, रुपेश पाटील, भास्कर मोकल, कविता पाटील, गणेश शिंदे, विनोद म्हात्रे, गणेश म्हात्रे, अतुल ठाकूर, मेघा मेस्त्री, वंदना पवार, आशिष गोवारी, माजी पदाधिकारी, उपशहरप्रमुख, विभागप्रमुख, शाखाप्रमुख, उपशाखाप्रमुख, गटप्रमुख, बूथप्रमुख प्रमुख कार्यकर्ते, आजी-माजी लोकप्रतिनिधी नगरसेवक, नगरसेविका, महिला आघाडीचे पदाधिकारी, सहभागी झाले होते.

## मुंबई...असह्यनगरी

मुंबईचा उल्लेख कोकणी लोक मायमुंबई असा करतात. पिढ्यानपिढ्या कोट्यवधी लोक इथे पोट भरायला आले. इथलेच झाले. मुंबई महाराष्ट्रात राहावी म्हणून त्यांनी लढे दिले. मुंबईची संस्कृती वेगळी आहे, इथे शिस्त आहे याचा अभिमान बाळगला. पण आता ही मुंबई कोसळत चालली आहे. ही नगरी आता राहणारांना असह्य होऊ लागली आहे. काही दिवसांपूर्वी अंधेरीत लोकलचा दरवाजा बंद करण्याच्या वादातून एकाने दुसऱ्यावर चाकूने वार केले. त्यात दुसऱ्याचा मृत्यू झाला. त्याहीपूर्वी मालाडला एका गणिताच्या प्राध्यापकाची अशीच हत्या झाली. लोकलच्या दरवाजात उभ्या असलेल्या तरुणाला बाजूला व्हायला सांगितले याचा राग येऊन तरुणाने शस्त्राने वार केले. कालपरवा अंबरनाथ लोकलमध्ये मध्यरात्री बसण्याच्या जागेवरून वाद होऊन हाणामारी झाली. त्यात तीन जण गंभीर जखमी झाले. मुंबईच्या लोकलमध्ये गर्दी असणे हे नवीन नाही. किंबहुना, देशभर मुंबईची ती ओळख आहे. भांडणे पूर्वापार होत होती. पण शस्त्रे काढून खून करण्यापर्यंत गोष्टी गेल्या नव्हत्या. अगदी टोळीयुध्दे ऐन भरात होती तेव्हाही सहसा सामान्य लोकांना त्यांच्या हाणामाऱ्यांचा त्रास होत नसे. पण आता समोरच्या माणसाला बाजूला सरक असे म्हटले किंवा रील्सचा आवाज कमी कर असे म्हटले तर तो पिस्तुलच काढील की काय अशी भीती आहे. इथली गर्दी अतोनात हाताबाहेर गेली आहे. आणि या गर्दीची सहनशक्ती कमी होऊ लागली आहे, याची ही सर्व लक्षणे आहेत. समोरच्याचे ऐकून घेण्याची किंवा सार्वजनिक जागी शिस्त पाळण्याची वृत्ती नष्ट होत चालली आहे. कालपरवा कुर्ला स्टेशनवर एक इसम मोठा दंडुका घेऊन येणाऱ्याजाणाऱ्यांवर दहशत माजवताना दिसला. कुर्ल्यासारख्या सदैव गजबजलेल्या स्टेशनवर हजारो लोकांच्या देखत आणि पोलिसांच्या उपस्थितीत हा प्रकार घडत असेल तर स्थिती किती बिघडली आहे हे कळावे. या इसमाला नंतर पकडण्यात आले हे ठीक. पण गर्दीच्या ठिकाणी कोणीही इसम लोकांना सहज वेठीला धरू शकतो हे त्यावरून पुन्हा एकदा दिसले.

### झाडे पडणारच

दुसरा मुद्दा मुंबईच्या तथाकथित विकासाचा आहे. मुंबई म्हणजे बेछूट बांधकामे, उंच इमारती हे चित्र पूर्वापार आहे. पण आता त्याचा कळस गाठला गेला आहे. सर्व हद्दी पार झाल्या आहेत. त्यातच आता रस्ते, भुयारी मार्ग, उड्डाणपूल यांची कहर बांधकामे चालू आहेत. यातून उडणारी धूळ इतकी प्रचंड आहे की मध्यंतरी कोर्टाला आदेश देऊन ही बांधकामे बंद करावी लागली होती. या रस्ते वगैरेंच्या बांधकामाला सरकार विकास म्हणते आणि त्यांना विरोध करणाऱ्यांना महाराष्ट्रद्रोही ठरवते. मिसिंग लिंकवर दरड कोसळल्यावर टीका करणाऱ्यांना मुख्यमंत्री काय म्हणाले हे आपण अलिकडेच पाहिले. रस्ते इत्यादींमुळे मुंबईत सर्वत्र काँक्रीटचे जंगल निर्माण झाले आहे. माणसांना आणि झाडांना श्वास घ्यायलाही जागा उरलेली नाही. मध्यंतरी झालेल्या पावसात झाडे पडण्याची जणू साथच आली होती. चेंबूरला झाड पडून एका शाळकरी मुलाचा मृत्यू झाला. ते प्रकरण गाजत आहे. या प्रकरणी आधी पालिकेच्या उद्यान आणि रस्ते विभागाच्या अभियंत्यांना व अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. पण आता या प्रकरणाचा जो अहवाल आला आहे त्यात यांचा काही दोष नाही असे म्हटले आहे. हा अहवाल येण्याच्या आधीच आयुक्त अश्विनी भिडे यांनी काँक्रिटीकरणामुळे झाडे पडतात हे खरे नाही असे सांगून टाकले होते. याच भिडेबाईंनी मेट्रोच्या कामासाठी आरेच्या जंगलातील शेकडो झाडे एका रात्रीत कापली होती. त्यामुळे त्यांना झाडांचे प्रेम नाही हे दिसले होतेच. पण त्यांच्याबाबतचे सामान्य ज्ञानही नाही हे परवा दिसले. भूगोलाच्या दृष्टीने पाहिल्यास मुंबई ही कोकणाचाच एक भाग आहे. कोकणासारखाच पाऊस तिथे पडतो. त्यामुळे सुदैवाने इथे बरीच झाडे टिकून आहेत. पण रस्तोरस्ती काँक्रीट पसरल्यामुळे या झाडांची मुळेही सिमेंटने बंद झाली आहे. त्यांना आधारासाठी पुरेशी माती शिल्लक नाही. मुळांना श्वास घ्यायला जागा नाही. शिवाय माती नसल्याने पाणी झिरपत नाही. त्यातून वर वाढलेल्या झाडांच्या फांद्या सरसकटपणे कशाही कापल्या जातात. त्यामुळे झाडांचा तोल ढळतो. एकाच बाजूवर भार वाढतो. मुळे कमजोर होतात. झाडे पडतात. पण भिडेबाई आणि त्यांचे प्रशासन हे मानायला तयार नाही. आता खुद्द महापौरांनीच प्रशासनाच्या या थियरीला नाकारले आहे. चेंबूरमध्ये झाड पडण्याला अधिकाऱ्यांची बेपर्वाई कारणीभूत आहे असे भाजपच्या महापौरांचे ठाम मत आहे.

### पोकळ विकास

बेपर्वाई असो नसो, पण झाडे पडण्याला काँक्रिटीकरण नक्कीच जबाबदार आहे हे कोणीही सांगू शकेल. आणि या काँक्रिटीकरणाला पार देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यापासून सगळे नेते आणि ते गात असलेली विकासाची भजने जबाबदार आहेत. चारच दिवसांपूर्वी दक्षिण मुंबईतल्या किनारी मार्गावरच्या भुयारात एका गाडीने पेट घेतला. तिचा धूर सर्व बोगद्यात पसरला आणि लोकांमध्ये घबराट निर्माण झाली. मुंबईत मेट्रो रेल्वेचा काही भाग भुयारात आहेच. आणखीही काही बांधला जाणार आहे. बोरीवली ते ठाणे यांच्यादरम्यान एक मोठा भुयारी रस्ता निर्माण केला जायचा आहे. या भुयारांमधल्या सुरक्षिततेची पुरेशी काळजी घेतली जाणार का हे प्रश्नचिन्ह आहे. दोनच दिवसांपूर्वी बुलेट ट्रेनच्या कामासाठी बांधलेला पूल पावसामुळे वाहून गेला. यामुळे बुलेट ट्रेनचे काम ठप्प झाले असून आता नवीन पूल बांधेपर्यंत थांबणार आहे. मुंबईतला पाऊस, हवामान, समुद्राने वेढलेले असल्याने हवामानाची नाजूक स्थिती या गोष्टी लक्षात न घेताच दणादण बांधकामे चालू आहेत. त्याचे काय परिणाम होऊ शकतात याची ही चुणूक आहे. आज मेट्रो आणि रस्ते झाले असले तरी सामान्य माणसाचा प्रवासाचा वेळ कमी झालेला नाही. उलट रस्त्यावरच्या वाहतुकीचा वेग मंदावला आहे. मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या लोकल सेवेचा बोजवारा उडाला आहे. गाड्या रोज किमान पंधरा ते वीस मिनिटे उशिरा असतात. याविरुध्द आवाज उठवणारे कोणी नाही. राजकीय पक्षांना भलतेच विषय महत्वाचे वाटतात. लोकही आता याबाबत उदासीन झाले आहे. हे असेच चालू राहणार असे ते गृहित धरू लागले आहेत. यंदा पाऊस कमी असल्याने सरकार आणि प्रशासन बचावले आहे. अन्यथा, मुंबईत जागोजागी पूर येतील अशी व्यवस्था झालेली आहे. पाणी वाहून जाण्याच्या सर्व जागा बंद झाल्या आहेत. मध्यंतरी तीन-चार दिवस बरा पाऊस होताच असे पूर आले होतेच. याच रीतीने हे शहर पनवेल, पालघर, शहापूर अशा विविध दिशांनी फैलावते आहे. तिथेही विकासाचे हेच मॉडेल राबवले जाते आहे. मूळ मुंबई ब्रिटिशांनी बांधलेली असल्याने किमान मोठे रस्ते, गटारे, पाणी जाण्यासाठी उतार यांची नीट आखणी होती. त्या आधारे ते कसेबसे तग धरून आहे. पनवेल इत्यादी नव्या शहरांमध्ये तर बेबंद विकास चालू आहे. त्यातून मोठ्या दुर्घटना घडण्याची तजवीज होते आहे. रोजच्या जगण्याचा दर्जा सुधारण्याऐवजी खराब करण्याच्या दिशेनेच हे जात आहे. केवळ रोजगार मिळतो आणि चार पैसे अधिक मिळतात म्हणून मुंबईला कसेबसे लटकून राहणे हेच कोट्यवधी लोकांचे प्राक्तन झाले आहे.

**विचार**

# लोकलाडाची किंमत विकासाने चुकवायची?

*राज्याचा विकास हा घोषणांनी नाही, तर सक्षम तिजोरीवर उभा असतो. तिजोरीच कमकुवत झाल्यास कोणतीही योजना, आश्वासन किंवा राजकीय विजय फार काळ टिकत नाही. हीच महाराष्ट्राच्या आजच्या अर्थकारणासमोरील खरी परीक्षा आहे. या परीक्षेत सरकारने लोकप्रियतेपेक्षा वित्तीय शिस्त निवडली, तरच राज्याचा विकास टिकाऊ राहील. अन्यथा, आजच्या पुरवणी मागण्या उद्याच्या आर्थिक संकटाची प्रस्तावना ठरतील.*



**भागा वरखडे**

राज्याचा अर्थसंकल्प म्हणजे सरकारची विकासाची दिशा ठरवणारा आराखडा असतो; पण अवघ्या तीन महिन्यांमध्येच त्या आराखड्याला तडे जाऊ लागल्यास त्यामागे केवळ आर्थिक अडचण नसते, तर नियोजनातील त्रुटी, राजकीय प्राधान्यक्रमातील विसंगती आणि वित्तीय शिस्तीच्या अभावाची स्पष्ट कबुली असते. महाराष्ट्रात आज नेमकी हीच परिस्थिती निर्माण झाली आहे. अर्थसंकल्पात ४० हजार कोटी रुपयांहून अधिक महसुली तूट, दीड लाख कोटी रुपयांची वित्तीय तूट गृहीत धरली असतानाच ९७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या, 'जलजीवन मिशन'साठी तब्बल २२ हजार ८९८ कोटी रुपयांचा अतिरिक्त भार, शेतकरी कर्जमाफी, लाडकी बहीण योजना, मोफत वीज आणि वाढते कर्ज या सगळ्या घडामोडींनी महाराष्ट्राच्या अर्थकारणातील संकट उघड्यावर आणले आहे. वास्तविक, अर्थसंकल्प हा अंदाजपत्रक असला तरी त्यामागे काटेकोर आर्थिक गणित असते. सरकार किती महसूल उभा करणार, किती खर्च करणार आणि किती कर्ज घेणार याचे संतुलन त्यात अपेक्षित असते; परंतु अवघ्या पहिल्याच तिमाहीमध्ये जवळपास एक लाख कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडाव्या लागतात, याचा अर्थ मूळ अर्थसंकल्प वास्तवापासून दूर होता. याहून मोठा प्रश्न म्हणजे या अतिरिक्त खर्चासाठी पैसा येणार कुठून? आज महाराष्ट्राच्या अर्थकारणातील सर्वात मोठा विरोधाभास असा आहे, की सरकारच्या घोषणा वाढत आहेत; पण उत्पन्न त्याच वेगाने वाढत नाही. करसंकलनात मोठी झेप नाही.

औद्योगिक गुंतवणुकीवर जागतिक आणि राष्ट्रीय आर्थिक परिस्थितीचा परिणाम होत आहे. जीएसटीतील राज्यांचा वाटा अनेकदा अपेक्षेपेक्षा कमी पडतो. अशा वेळी खर्च मात्र सतत वाढत आहे. आर्थिक भाषेत सांगायचे झाले, तर राज्याच्या उत्पन्न आणि खर्चातील दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. सरकारचे समर्थक असा युक्तिवाद करतील, की महिला, शेतकरी आणि गरीबांसाठीच्या योजना थांबवता येणार नाहीत. हे खरेही आहे. कल्याणकारी राज्यात सरकारची सामाजिक जबाबदारी असते; पण सामाजिक जबाबदारी आणि आर्थिक बेफिकिरी यांच्यातील सीमारेषा ओलांडली गेल्याची किंमत संपूर्ण समाजाला चुकवावी लागते. शेतकरी कर्जमाफी याचे सर्वात मोठे उदाहरण आहे. निवडणुकीच्या तोंडावर किंवा राजकीय दबावाखाली कर्जमाफीची घोषणा करणे सोपे असते; परंतु त्यासाठी निधीची तरतूद न करता घोषणा करणे हे आर्थिक शिस्तीच्या सर्व नियमांना हरताळ फासणारे आहे. त्यानंतर पुरवणी मागण्यांमधून निधी उभा करावा लागतो. म्हणजेच आधी निर्णय आणि नंतर आर्थिक विचार. ही पद्धत दीर्घकाळ चालू शकत नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, मोफत वीज योजना आणि विविध अनुदानांचा खर्चही याच श्रेणीत मोडतो. या योजनांमुळे लाखो कुटुंबांना दिलासा मिळत असला, तरी त्या अर्थव्यवस्थेला उत्पादक बनवतात का, हा मूलभूत प्रश्न आहे. हातात रोख रक्कम देणे आणि रोजगार निर्माण करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. रोजगार वाढल्यास महसूल वाढतो. अनुदान वाढल्यास खर्च वाढतो, हा आर्थिक नियम आहे. या संकटामध्ये केंद्र सरकारची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे.

'जलजीवन मिशन'साठी राज्याला स्वतःच्या निधीमधून २२ हजार ८९८ कोटी रुपये खर्च करावे लागत आहेत. ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना रखडू नयेत, म्हणून राज्याने हा निर्णय घेतला; पण प्रश्न असा आहे, की केंद्र पुरस्कृत योजनांचा वाढता आर्थिक भार राज्यांवर टाकणे कितपत योग्य आहे? संघराज्य व्यवस्थेत जबाबदाऱ्यांसोबत आर्थिक सामर्थ्याचाही समतोल आवश्यक असतो. अन्यथा, राज्ये कर्ज काढून केंद्राच्या योजना राबवतील आणि स्वतःच्या विकासासाठी पैसा उरणार नाही. याचा सर्वाधिक परिणाम कुठे होणार? उत्तर स्पष्ट आहे, विकासकामांवर. सरकारी तिजोरी रिकामी होऊ लागली, की सर्वप्रथम भांडवली खर्चावर कात्री चालते. पगार, पेन्शन, अनुदाने किंवा लोककल्याणकारी योजना थांबवणे राजकीयदृष्ट्या अशक्य असते. त्यामुळे रस्ते, पूल, सिंचन, शाळा, रुग्णालये, औद्योगिक पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास यांवरील खर्च कमी केला जातो. म्हणजेच आजचा राजकीय फायदा उद्याच्या विकासाच्या किंमतीवर मिळवला जातो. हीच महाराष्ट्रासमोरील खरी भीती आहे. राज्याची आर्थिक ताकद ही उद्योग, सेवा क्षेत्र, शेती आणि पायाभूत सुविधांवर उभी आहे. विकासासाठीचा निधीच कमी झाला, तर उद्योगांची स्पर्धात्मकता घटेल, रोजगारनिर्मिती मंदावेल आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा वेग कमी होईल. विकास थांबला, की महसूलही थांबतो आणि मग कर्जाचा फास आणखी घट्ट होत जातो. आज राज्यावरील कर्ज ११ लाख कोटी रुपयांच्या घरात पोहोचण्याचा अंदाज आहे. त्यावरील सुमारे ७० हजार कोटी रुपयांचे व्याज हा स्वतंत्र खर्च आहे. या रकमेत किती नवीन रुग्णालये उभी राहू शकली असती, किती सिंचन प्रकल्प पूर्ण झाले असते, किती ग्रामीण रस्ते बांधले गेले असते या प्रश्नांची उत्तरेच वित्तीय संकटाची तीव्रता सांगतात. विशेष चिंता निर्माण करणारी बाब म्हणजे पुरवणी मागण्या आता अपवाद राहिलेल्या नाहीत. त्या वार्षिक परंपरा बनत आहेत. अर्थसंकल्पात एका खर्चाचा उल्लेख करायचा, नंतर पुरवणी मागण्यांमधून त्याची व्यवस्था करायची आणि वर्षअखेरीस विकास निधी कमी करायचा ही पद्धत वित्तीय पारदर्शकतेलाच तडा देणारी आहे. अर्थसंकल्पाचे गांभीर्य यामुळे कमी होते. यातून बाहेर पडण्यासाठी सरकारला काही अप्रिय; पण आवश्यक निर्णय घ्यावे लागतील. प्रत्येक योजनेचे स्वतंत्र आर्थिक लेखापरीक्षण झाले पाहिजे. ज्या योजनांचा अपेक्षित परिणाम होत नाही, त्यांचे पुनर्मूल्यांकन झाले पाहिजे. महसूल वाढवण्यासाठी उद्योगांना पोषक वातावरण, गुंतवणुकीला गती, करचुकवेगिरीवर नियंत्रण आणि सरकारी खर्चातील अपव्यय रोखणे ही पावले तातडीने उचलावी लागतील. राजकीय नेतृत्वानेही एक मूलभूत प्रश्न स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. निवडणुका जिंकण्यासाठी योजना जाहीर करायच्या, की पुढील पिढीसाठी सक्षम अर्थव्यवस्था उभी करायची? कारण अर्थकारणाचा एक कठोर नियम आहे- मोफत काहीच नसते.

आज सरकार जे काही मोफत देते, त्याची किंमत उद्या करदाते, उद्योग, तरुण पिढी किंवा विकासकामांच्या स्वरूपात समाजालाच चुकवावी लागते. महाराष्ट्राला आज आर्थिक दिवाळखोरीचा धोका नाही; पण वित्तीय शिस्त ढासळण्याचा धोका निश्चित आहे. हा धोका वेळेत ओळखला नाही, तर राज्याची आर्थिक ताकद हळूहळू कमी होईल. महाराष्ट्राने देशाला उद्योग, सहकार, शेती आणि विकासाचे नेतृत्व दिले आहे. त्या राज्याने आता लोकलाडाच्या राजकारणाला अर्थशास्त्राची जोड देण्याची गरज आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने काही कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे. प्रत्येक योजनेचे परिणाममूल्यांकन करून उपयुक्तता तपासली पाहिजे. अनुत्पादक खर्च कमी केला पाहिजे. महसूल वाढवण्यासाठी करसंकलन अधिक कार्यक्षम करणे, करचुकवेगिरी रोखणे, सार्वजनिक मालमत्तेचा उत्पादक वापर करणे आणि खासगी गुंतवणुकीला चालना देणे आवश्यक आहे. केवळ कर्ज घेऊन अर्थव्यवस्था चालत नाही. केंद्र सरकारनेही राज्यांकडे केवळ अंमलबजावणी यंत्रणा म्हणून पाहण्याऐवजी आर्थिक भागीदार म्हणून पाहिले पाहिजे. केंद्र पुरस्कृत योजनांमध्ये आर्थिक वाटा वाढवत असताना राज्यांच्या महसुली क्षमतेचाही विचार होणे गरजेचे आहे. अन्यथा, राज्यांवर कर्ज काढून केंद्राच्या योजना राबवण्याची वेळ येईल, ही संघराज्य व्यवस्थेसाठी हितावह स्थिती ठरणार नाही. राजकारणात लोकप्रिय निर्णयांना नेहमीच टाळ्या मिळतात; पण अर्थकारणात लोकप्रियतेपेक्षा टिकाऊपणाला अधिक महत्त्व असते. निवडणुका जिंकण्यासाठी योजना जाहीर करणे सोपे असते. त्या दीर्घकाळ आर्थिकदृष्ट्या सक्षम ठेवणे मात्र कठीण असते. महाराष्ट्रासारख्या आर्थिकदृष्ट्या सक्षम राज्याने आज वित्तीय शिस्त गमावली, तर उद्या विकासासाठी आवश्यक संसाधने उभारणे अधिक कठीण होईल.

**चर्चा आजची**

# शेतीपासून दूरावण्याचा धोका



**अंतरा पारंगे**

जिल्ह्यातील शेती आजही पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. मात्र बदलत्या वातावरणामुळे गेल्या काही वर्षात पाऊस अनियमित पडत असल्याचे दिसून येत आहे. कधी पाऊस वेळेवर सुरु होतो, तर कधी कधी पाऊस लांबणीवर जातो. याचा परिणाम पीक पेरणीवर होतोच, पण पुढे पीकही कमी येऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. तसेच वाढत्या औद्योगिकीकरणासह नागरिकीकरणामुळे शेती क्षेत्रही कमी होऊ लागले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकरी भात शेतीपासून दुरावण्याचा धोका वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

रायगड जिल्ह्याला पुर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. मात्र वाढते औद्योगिकरण, कमी उत्पन्न व खर्च अधिक यामुळे शेती करण्याकडे दुर्लक्ष अशा अऩेक कारणामुळे शेतीचे क्षेत्र कमी होऊ लागले. शेती क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घेतला. आधुनिक शेतीसह सेंद्रीय शेती करण्यासाठी उपक्रम सुरु केले. भातशेतीसह फळ पिक व भाजी लागवड करण्याचे आवाहन केले. त्या आवाहनाला चांगला प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील शेतक्री आंबा, काजू या फळपिकांसह भाजीपाला पीक लागवड करण्याकडे आकर्षित होऊ लागले. त्यामध्ये भात शेतीमधून शेतकऱ्यांना उत्पन्न मिळावे, म्हणून वेगवेगळ्यायोजनांमधून बियाणे खते देण्यात आली. शेतकरी भात लागवड करू लागला. मात्र बदलत्या हवामानाचा फटका जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बसत आहे.

जिल्ह्यात बहुतांश शेतकऱ्यांकडे वडिलोपार्जित शेती आहे. अनेक शेतकरी पिढ्यान्पिढ्या चालत आलेली शेती करत आहेत. जस जशी लोकसंख्या वाढत आहे, तसतशी शेतजमीन कमी होत चालली आहे. कारण वारसानुसार जमिनींचे तुकडे होत आहेत. वाढत्या लोकवस्तीसाठी घरांचीदेखील गरज वाढते. यावर पर्याय म्हणून काही जण शेतातच घर बांधतात. मग घराभोवती कुंपण, थोडी मोकळी जागा ठेवतात. त्यामुळे शेतीचे क्षेत्र घटत आहे.

वाढते खासगी प्रकल्प, औद्योगिकीकरण, महामार्गांचे जाळे, रेल्वे प्रकल्प आणि झपाट्याने होणारे शहरीकरण हीदेखील शेती क्षेत्र घटण्याची मुख्य आणि मोठी कारणे आहेत. विविध पायाभूत प्रकल्पांसाठी मोठ्या प्रमाणावर शेतीची जमीन संपादित केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. शेती घटण्याचे दुसरे आणि महत्वाचे कारण म्हणजे निसर्गाचा लहरीपणा जसे की, अवकाळी पाऊस, दुष्काळ, महापूर, आणि शेतमालाला मिळणारा अनिश्चित भाव यामुळे अनेक शेतकरी शेती सोडून इतर व्यवसायाकडे वळत आहेत.

औद्योगिकीकरणामुळे रोजगाराची नवी साधने उपलब्ध झाली आहेत. त्यामुळे कष्टदायी समजल्या जाणाऱ्या शेती व्यवसायाकडे नवीन पिढी यायला तयार नाही. त्यामुळे शेतीसाठी मजूरांची चणचण जाणवते. उद्योग आणि बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या मजूरांना जादा मोबदला दिला जातो. त्यामुळे ते अल्पमजूरीत शेतीसाठी कामाला येण्यास फारसे उत्सूक नसतात. त्यामुळे शेतीसाठी मजूरांची जुळवाजुळव करणे आव्हानात्मक ठरते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी भात शेतीकडे पाठ फिरविण्यास सुरूवात केली आहे.

कोकणातील बहुतांश शेतकरी हे अल्प आणि मध्यमभूधारक आहेत. त्यांच्याकडे असलेली जमिनीचे क्षेत्र अतिशय कमी असते. अल्पभूधारक शेतकऱ्यांना यांत्रिकीकरणाचा उपयोग करता येत नाही. आणि काहींनी तो केला तरी तो आर्थिकदृष्ट्या त्यांना परवडणारा नसतो. त्यामुळे शेतकरी यांत्रिकीकिकरणाकडे वळत नाहीत. काहींची शेती ही डोंगराळ भागात असते. त्यामुळे उंच सखल भागामुळेही यांत्रिकीकरणाचा वापर करणे शक्य होत नाही. त्यामुळे डोंगराळ भागातील शेतकरी शेती लागवडीकडे पाठ फिरवत असल्याचे दिसून येत आहेत.

वातावरणातील बदलांचाही जिल्ह्यातील भात शेतीवर मोठा परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. नैसर्गिक आपत्तीचे संकट गेल्या अनेक वर्षापासून शेतकऱ्यांना भेडसावत आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पूर परिस्थिती अशा अनेक कारणांमुळे भात उत्पादक शेतकऱ्यांची प्रचंड हानी होते. जूनच्या सुरवातीला दाखल होणारा मान्सून उशीराने दाखल होतो. त्यानंतर तो अनियमिक पडतो, उशीरा पर्यंत लांबतो, कापणीच्या कालावधीत पाऊस झाला तर हाता तोंडाशी आलेले पिक नष्ट होते. शेतकऱ्यांचे नुकसान होते. याशिवाय लागवडीच्या कालावधीत उष्णता अचानक वाढल्यास पिकावर विपरीत परिणाम होतो. किड रोगांचा प्रादुर्भावही वाढतो. राज्यसरकारने हवामान आधारीत पिक विमा योजना लागू केली असली तरी त्याचा फारसा लाभ शेतकऱ्यांना मिळत नाही. परिणामी शेतकरी शेतीकडे पाठ फिरवित असल्याचे चित्र आहे.

शेतकऱ्याला सर्व बाजूनेच संकट असतात. महागडी बियाणे, वाढती मजुरी, खते यामुळे शेतकऱ्यावर आर्थिक बोजा वाढतो. अनियमित पावसाचा परिणाम होतो. एका हंगामाचा भाग सर्वसाधारणपणे चार महिन्याचा राहतो. या चार महिन्यात हवामानातील सर्व बदल पिकाला झेलता झेलता नाकी नऊ येतात. कधी जास्त पाऊस तर कधी पावसाचा ताण, कधी रोगांची लागण तर कधी आवश्यक ओल नसल्यामुळे कमी उगवण या सर्वांचा उत्पादनावर विपरित परिणाम होतो. हे सर्व करुन आवश्यक उत्पादन न मिळाल्यामुळे आपला शेतकरी वर्ग पार खचून जातो. इतक्या सर्व संकटातून पार पडत पडत जेव्हा त्याच्या पदरी शेतीचे उत्पादन हाती पडते. मात्र बाजारभाव त्याला मारक ठरतात.

**लोकसंसद**

## जगाला सुखाने नांदू द्यात

आज अमेरिका व इराण यांच्यात गेले सुमारे पाच महिने युद्ध चालू आहे. तसेच रशिया व युक्रेन यांच्यात गेले अनेक वर्षे युद्ध चालूच आहे. या युद्धात प्रत्येक राष्ट्र आपलाच विजय झाला अशी वल्गनाही करीत आहे. प्रत्यक्षात या सर्व राष्ट्रांची प्रचंड हानी झालेली आहे. इतकेच काय पण शेजारी काही राष्ट्रांना सुद्धा याची झळ पोहचली आहे. अमेरिका व इराण यांच्यात वाटाघाटी होऊन युद्धबंदी झाली पण ती नावालाच होती असे वाटते . इराण सारख्या राष्ट्राने अमेरिकेशी जी टक्कर दिली ती अमेरिकेला सुद्धा जड गेली. करोडो डॉलर्सचे नुकसान तर झालेच याशिवाय प्रचंड मनुष्य हानी झाली साऱ्या जगाने दोन महायुद्धाचे परिणाम भोगले आहेत. जपानसारख्या राष्ट्राने तर हिरोशिमा व नागासाकी या शहरातील लाखो लोक गमावले आहेत. युद्धात विजयी व पराभूत अशा दोनही राष्ट्रांचे नुकसान होत असते. हे माहित असूनही जगात अजूनही युद्धे होत आहेत. या युद्धाने जगातील जवळ जवळ सर्वच राष्ट्रात महागाई वाढली तसेच इंधनाचे दरही वाढले की ज्यामुळे सामान्य माणसाचे जीवन अवघड झाले. युद्धे होऊ नयेत व जगात शांतता नांदावी या हेतूने राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली यामध्ये अमेरिकेचा सुद्धा सहभाग होता. असे असूनही आज अमेरिका संयुक्त राष्ट्रसंघाला काय किंमत देत आहे हे सारे जग पहात आहे. आज अमेरिका लष्करी व पैशाने अतिशय श्रीमंत राष्ट्र आहे. त्यामुळे इतर राष्ट्रे फारसा आवाज उठवू शकत नाहीत. वास्तविक जगाला सुखाने राहू द्यात अशी विचारसरणी पुढे आणावी अशी अनेकांची इच्छा आहे तो सुदिन लवकरच येवो.

**- शांताराम वाघ पुणे**

**दिनविशेष**

# मानवतेचे आणि क्रांतीचे प्रतीक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे

१८ जुलै हा दिवस महाराष्ट्राच्या आणि भारताच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक इतिहासात 'लोकशाहीर अण्णा भाऊ साठे' या महत्त्वाच्या नावाने कोरला गेला आहे. या दिवशी अण्णा भाऊंनी आपला देह ठेवला असला, तरी त्यांची विचारसंपदा आणि संघर्षशील लेखणी काळाच्या सीमा ओलांडून आजही जिवंत आहे. शोषित, पीडित, भटक्या-विमुक्त, दलित आणि कष्टकरी समाजाचा बुलंद आवाज बनून अण्णा भाऊंनी आपले संपूर्ण जीवन अर्पण केले. त्यांच्या स्मृतिदिनी त्यांच्या कार्याचा मागोवा घेणे ही सामाजिक कृतज्ञतेची खरी अभिव्यक्ती आहे. अण्णा भाऊ साठे, यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे, ते केवळ एक साहित्यिक नव्हते; ते एक क्रांतिकारी विचारवंत, लोककलावंत, समाजसुधारक आणि कष्टकऱ्यांच्या हक्कांसाठी लढणारे झुंजार नेते होते. त्यांच्या साहित्यातून आणि कार्यातून त्यांनी समाजातील वंचितांना, उपेक्षितांना आणि शोषितांना एक नवी वाचा दिली. त्यांचे जीवन हे गरिबी, संघर्ष आणि अन्यायाविरुद्धच्या लढ्याचे समाजाला आजही दिशा देणारे प्रेरणादायी उदाहरण आहे. अण्णा भाऊंचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे एका मातंग कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी गरिबी, उपेक्षा आणि जातीय विषमतेचा सामना केला. अत्यंत दारिद्र्यात आणि विषमतेच्या वातावरणात त्यांचे बालपण गेले. जातीव्यवस्थेमुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शाळेतील भेदभावामुळे त्यांनी केवळ दीड दिवसांतच शाळा सोडली. मात्र, त्यांच्यातील ज्ञानाची भूक आणि तीव्र निरीक्षणशक्ती यामुळे त्यांनी औपचारिक शिक्षणाशिवायच प्रचंड ज्ञान संपादन केले. त्यांनी अनुभवातून ज्ञान मिळवले. स्वप्रयत्नाने वाचनाची प्रचंड आवड जोपासली. त्यांच्या जीवनातील खडतर अनुभवांनी त्यांना समाजातील अन्याय आणि विषमतेची तीव्र जाणीव करून दिली. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याची खरी ताकद होती ती त्यांच्या ज्वलंत आणि वास्तववादी चित्रणामध्ये. त्यांच्या लेखणीला क्रांतीची धार होती. त्यांनी अनेक कादंबऱ्या, कथा, पोवाडे, लावण्या, वगनाट्ये आणि लोकनाट्यांची निर्मिती केली. ङ्गफकिराफ ही त्यांची प्रसिद्ध कादंबरी एका दलित युवकाच्या सामाजिक विद्रोहाची कथा असून, ती त्यांच्या तळागाळातील जीवनाच्या प्रगल्भ निरीक्षणाची साक्ष देते. ही कादंबरी केवळ एका पात्राची कथा नाही, तर एका वर्गाच्या आत्मभानाची आणि अन्यायाविरोधातील संघर्षाची कहाणी आहे. 'फकिरा'मधून त्यांनी मातंग समाजातील ब्रिटिशांविरुद्धच्या एका नायकाच्या, फकिराच्या संघर्षाचे प्रभावी चित्रण केले आहे. फकिराचे शौर्य, त्याचा अन्यायाविरुद्धचा लढा आणि त्याच्या समाजाचे दुःख यातून स्पष्टपणे समोर येते. अण्णा भाऊंचे लेखन ङ्गमीफ च्या स्वरुपात कधीच आत्मकेंद्रित नव्हते. ते ङ्गआम्हीफ या व्यापक रूपात प्रकट होत होते. त्यांनी लेखनात माणसाच्या जगण्याची लढाई मांडली. त्यांच्या कथांतून आणि कादंबऱ्यांतून भूक, जातिभेद, अन्याय, कामगारांचे शोषण आणि व्यवस्थेचा दुजाभाव हे सामाजिक वास्तव पुढे आले. पण त्याच वेळी त्यांच्या साहित्याने संघर्षाची प्रेरणा दिली आणि लढण्याची उमेद दिली. 'अकलेची गोष्ट', 'शेटजींचे राज्य', 'बेकायदेशीर' यांसारख्या नाटकांतून त्यांनी सामाजिक विषमतेवर आणि शोषणावर कठोर प्रहार केले. त्यांच्या लोकनाट्यामध्ये विनोद, व्यंग्य आणि प्रबोधन यांचा सुंदर मिलाफ होता. त्यांच्या अनेक कादंबऱ्या आणि कथांवर आधारित 'फकिरा', 'वैजयंता' यांसारखे चित्रपटही बनले, ज्यामुळे त्यांच्या साहित्याने मराठी चित्रपटसृष्टीलाही एक नवी दिशा दिली.

RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक ५४] शुक्रवार, जुलै १०, २०२६/आषाढ १९, शके १९४८ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ८०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

क्रमांक संकिर्ण-एस.आर.क्र. १६३२ ते १६३६ / २०२६. - ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्र. संकिर्ण ११/२०१४/प्र.क्र.७७ / अ-२, दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ ( यात यापुढे जिचा निर्देश ''उक्त अधिसूचना'' असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील १०,००० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरीता भूमीसंपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश 'उक्त जमीन' असा करण्यात आला आहे) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त 'सार्वजनिक प्रयोजन' असा करण्यात आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. असे वाटते, ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमुद करावीत;)

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर, या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम ४ अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुद्धीपुरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार, जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश ''उक्त नियम'' असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप नियम (३) द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमिअभिलेखाच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवारात, ता. अलिबाग, जि. रायगड यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**

जमिनीचे वर्णन

गावाचे नाव मौजे भालिवडी, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | ७०/१ | ०.३४.४१ |
| २ | ७०/२ | |
| ३ | ७०/३ | |
| ४ | ७०/४ | |
| ५ | ७०/५/अ | |
| ६ | ७०/५/ब | |
| ७ | ७१/१ | ०.१८.५२ |
| ८ | ७१/२ | |
| ९ | ७१/३/अ | |
| १० | ७१/३/ब | |
| ११ | ७१/३/क | |
| १२ | ७३/१ | ०.२९.२० |
| १३ | ७३/२ | |
| १४ | ७३/३ | |
| १५ | ७३/४ | |
| १६ | ७३/५ | |
| १७ | ७७/१/अ | ०.६१.०१ |
| १८ | ७७/१/ब | |
| १९ | ७७/२ | |
| २० | ७७/३ | |
| २१ | ७७/४ | |
| २२ | ७७/५/अ | |
| २३ | ७७/५/ब | |
| २४ | ७७/५/क | |
| २५ | ८२/१ | ०.०३.७३ |
| २६ | ८२/२ | |
| २७ | ८२/३ | |
| २८ | ८२/४ | |
| २९ | ८२/५ | |
| ३० | ८२/६/१ | |
| ३१ | ८२/६/२ | |
| ३२ | ८२/७ | |
| ३३ | ८२/८ | |
| ३४ | ८३/१/अ | ०.३०.१० |
| ३५ | ८३/१/ब | |
| ३६ | ८३/२ | |
| ३७ | ८३/३ | |
| ३८ | ८३/४ | |
| ३९ | ८४/१ | ०.३०.९७ |
| ४० | ८४/२/अ | |
| ४१ | ८४/२/ब | |
| ४२ | ८४/३ | |
| ४३ | ८४/४ | |
| ४४ | ८४/५ | |
| ४५ | ८५/१ | ०.२२.०८ |
| ४६ | ८५/२ | |
| ४७ | ८५/३ | |
| ४८ | ८५/४ | |
| ४९ | ८५/५ | |
| ५० | ९३/१ | ०.२६.७९ |
| ५१ | ९३/२/अ/१ | |
| ५२ | ९३/२/अ/२ | |
| ५३ | ९३/२/अ/३ | |
| ५४ | ९४/१/अ | ०.३५.९४ |
| ५५ | ९४/१/ब | |
| ५६ | ९४/२ | |
| ५७ | ९५/१ | ०.३६.०१ |
| ५८ | ९५/२ | |
| ५९ | ९५/३ | |
| ६० | ९६/१ | ०.२९.२२ |
| ६१ | ९६/२ | |
| ६२ | ९६/३ | |
| ६३ | ९६/४ | |
| ६४ | ९६/५ | |
| ६५ | ९६/६ | |
| ६६ | ९६/७ | |
| ६७ | ९६/८ | |
| ६८ | ९६/९ | |
| ६९ | ९६/१० | |
| ७० | ९६/११ | |
| ७१ | ९६/१२ | |
| | **एकूण** | **३.५७.९८** |

गावाचे नाव मौजे पोटल, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| १ | २०/१/अ | ०.२६.७८ |
| २ | २०/१/ब | |
| ३ | २०/३ | |
| ४ | २०/५ | |
| ५ | २०/६ | |
| ६ | २०/७ | |
| ७ | २०/८ | |
| ८ | २०/९ | |
| ९ | २०/१० | |
| १० | २०/११ | |
| ११ | २०/१२ | |
| १२ | ८२/१ | ०.०१.६३ |
| १३ | ८२/२ | |
| १४ | ८२/३/अ | |
| १५ | ८२/३/ब | |
| १६ | ८२/४/अ | |
| १७ | ८२/४/ब | |
| १८ | ८२/६ | |
| १९ | ८२/८ | |
| २० | ८२/९ | |
| २१ | ८२/१० | |
| २२ | ८२/११ | |
| २३ | ८२/१२ | |
| २४ | ८२/१३ | |
| २५ | ८२/१४ | |
| २६ | ८२/१५ | |
| २७ | ८२/१७ | |
| २८ | ८२/१८ | |
| २९ | ८२/१९ | |
| ३० | ८२/२१ | |
| ३१ | ८३/१ | ०.२७.५८ |
| ३२ | ८३/३ | |
| ३३ | ८३/४ | |
| ३४ | ८३/५/अ | |
| ३५ | ८३/५/ब | |
| ३६ | ८३/६/अ | |
| ३७ | ८३/६/ब | |
| ३८ | ८३/७ | |
| ३९ | ८३/९ | |
| ४० | ८४/१ | ०.४०.२० |
| ४१ | ८४/२ | |
| ४२ | ८४/३ | |
| ४३ | ८४/४ | |
| ४४ | ८४/५ | |
| ४५ | ८४/६ | |
| ४६ | ८४/७ | |
| ४७ | ८४/८ | |
| ४८ | ८४/९ | |
| ४९ | ८४/१०/अ | |
| ५० | ८४/१०/ब | |
| ५१ | ८४/११ | |
| ५२ | ८५/१ | ०.८७.९० |
| ५३ | ८५/२/अ | |
| ५४ | ८५/२/ब | |
| ५५ | ८५/३ | |
| ५६ | ८५/४ | |
| ५७ | ८५/६ | |
| ५८ | ८५/१० | |
| ५९ | ८५/११ | |
| ६० | ८९/१ | ०.४०.९७ |
| ६१ | ८९/२/अ/१ | |
| ६२ | ८९/२/अ/२ | |

पान ६ वर

पान ५ वरून

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|
| ६३ | ८९/२/ब | |
| ६४ | ८९/३ | |
| ६५ | ८९/४ | |
| ६६ | ८९/५ | |
| ६७ | ८९/६/अ | |
| ६८ | ८९/६/ब | |
| ६९ | ८९/६/क/१ | |
| ७० | ८९/६/क/२ | |
| ७१ | ८९/८ | |
| ७२ | ८९/९ | |
| ७३ | ८९/१० | |
| ७४ | ८९/११ | |
| ७५ | ८९/१२ | |
| ७६ | ९१/१/अ/१ | ०.३५.८४ |
| ७७ | ९१/१/अ/२ | |
| ७८ | ९१/१/ब | |
| ७९ | ९१/१/क | |
| ८० | ९१/२ | |
| ८१ | ९१/४ | |
| ८२ | ९१/५ | |
| ८३ | ९१/६ | |
| ८४ | ९२/१/अ | ०.४६.३१ |
| ८५ | ९२/१/ब/१ | |
| ८६ | ९२/१/ब/२ | |
| ८७ | ९२/१/ब/३ | |
| ८८ | ९२/१/१/क | |
| ८९ | ९२/१/क/२ | |
| ९० | ९२/१/क/३ | |
| ९१ | ९२/१/क/४ | |
| ९२ | ९२/२ | |
| ९३ | ९२/३ | |
| ९४ | ९७/१ | ०.२८.९८ |
| ९५ | ९७/२ | |
| ९६ | ९७/३ | |
| ९७ | ९७/४ | |
| ९८ | ९७/५ | |
| ९९ | ९७/६ | |
| **एकूण** | | **३.३६.१९** |

गावाचे नाव मौजे आंबोट, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | १/१/अ | ०.४४.१८ |
| २ | १/१/ब | |
| ३ | १/१/ड | |
| ४ | १/१/क | |
| ५ | १/२ | |
| ६ | १/३ | |
| ७ | २०/१/अ | ०.१०.४८ |
| ८ | २०/१/ड | |
| ९ | २०/१/ई | |
| १० | २०/१/फ | |
| ११ | २०/१/ह | |
| १२ | २०/१/क/१ | |
| १३ | २०/१/क/२ | |
| १४ | २०/१/य | |
| १५ | २०/२ | |
| १६ | २०/३ | |
| १७ | २१/१/अ | ०.६०.३९ |
| १८ | २१/१/क/१ | |
| १९ | २१/२ | |
| २० | २१/३ | |
| २१ | २२/१ | ०.६९.४५ |
| २२ | २२/२/अ | |
| २३ | २२/२/ब | |
| २४ | २२/२/क | |
| २५ | २२/३ | |
| २६ | २२/४ | |
| २७ | २२/५/अ/१ | |
| २८ | २२/७ | |
| २९ | २२/९ | |
| ३० | २५/१/अ/१ | ०.२२.९३ |
| ३१ | २५/१/ब | |
| ३२ | २५/१/ड | |
| ३३ | २५/१/ई | |
| ३४ | २५/१/फ | |
| ३५ | २५/१/क/१ | |
| ३६ | २५/२ | |
| ३७ | २५/३ | |
| ३८ | २७/१ | ०.६९.४५ |
| ३९ | २७/२ | |
| ४० | २७/३ | |
| ४१ | २७/४ | |
| ४२ | ३१/१/अ/१ | ०.७२.८९ |
| ४३ | ३१/१/ब/१ | |
| ४४ | ३१/१/ड/१ | |
| ४५ | ३१/१/क/१ | |
| ४६ | ३१/२ | |
| **एकूण** | | **३.४९.७७** |

गावाचे नाव मौजे सायडोंगर, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | ३०/१ | १.३२.७१ |
| २ | ३०/२ | |
| ३ | ३०/३ | |
| ४ | ३०/४/अ/१/अ | |
| ५ | ३०/४/अ/१/ब | |
| ६ | ३०/४/अ/१/२ | |
| ७ | ३०/४/ब | |
| ८ | ३०/५ | |
| ९ | ३०/६/अ | |
| १० | ३०/६/ब | |
| ११ | ३०/६/क | |
| १२ | ३०/७ | |
| १३ | ३०/८ | |
| १४ | ३०/९/अ/१ | |
| १५ | ३०/९/अ/२ | |
| १६ | ३०/९/ब | |
| १७ | ३०/१० | |
| १८ | ३०/११ | |
| १९ | ३०/१२/अ | |
| २० | ३०/१२/ब | |
| २१ | ३०/१३ | |
| २२ | ३०/१४ | |
| २३ | ३०/१५ | |
| २४ | ३०/१६ | |
| २५ | ३०/१७/अ | |
| २६ | ३०/१७/ब | |
| २७ | ३०/१८ | |
| २८ | ३०/१९ | |
| २९ | ३०/२० | |
| **एकूण** | | **१.३२.७१** |

गावाचे नाव मौजे पाली तर्फे कोतल खलाटी, ता. कर्जत, जि. रायगड.

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | १६/१ | ०.६३.०१ |
| २ | १६/२ | |
| ३ | १६/३ | |
| ४ | १६/४ | |
| ५ | १६/५ | |
| ६ | १६/६ | |
| ७ | १६/७ | |
| ८ | १६/८ | |
| ९ | १६/९ | |
| १० | १६/१० | |
| ११ | १६/११ | |
| १२ | १६/१२ | |
| १३ | १६/१३ | |
| १४ | १६/१४/अ | |
| १५ | १६/१४/ब | |
| १६ | १६/१५ | |
| १७ | १६/१६ | |
| १८ | १६/१७/अ | |
| १९ | १६/१७/ब | |
| २० | १६/१८ | |
| २१ | १६/१९ | |
| २२ | ३२/१ | |
| २३ | ३२/१/अ | |
| २४ | ३२/१/ब | |
| २५ | ३२/२ | |
| २६ | ३२/३ | |
| २७ | ३२/५ | |
| २८ | ३२/६ | |
| २९ | १९/१ | ०.३७.८९ |
| ३० | १९/२/अ | |
| ३१ | १९/२/ब | |
| ३२ | १९/३/अ | |
| ३३ | १९/३/ब | |
| ३४ | १९/४ | |
| ३५ | १९/५/अ | |
| ३६ | १९/५/ब | |
| ३७ | १९/६ | |
| ३८ | १९/७/अ | |
| ३९ | १९/७/ब | |
| ४० | १९/८/अ | |
| ४१ | १९/८/ब | |
| ४२ | १९/९/अ | |
| ४३ | १९/९/ब | |
| ४४ | १९/१० | |
| ४५ | २०/१ | ०.००.९७ |
| ४६ | २०/२ | |
| ४७ | २०/३ | |
| ४८ | २०/४ | |
| ४९ | २०/५ | |
| ५० | २२/१ | ०.३९.६० |
| ५१ | २२/२/अ | |
| ५२ | २२/२/क | |
| ५३ | २२/२/ब | |
| ५४ | २२/३ | |
| ५५ | २२/४ | |
| ५६ | २२/५ | |
| ५७ | २२/६ | |
| ५८ | २२/७ | |
| ५९ | २२/८ | |
| ६० | २२/९ | |
| ६१ | २२/१० | |
| ६२ | २२/११ | |
| ६३ | २९/१ | ०.७६.२२ |
| ६४ | २९/२ | |
| ६५ | २९/३ | |
| ६६ | २९/४/अ/१ | |
| ६७ | २९/४/अ/२ | |

पान ७ वर

( पान ६ वरून)

| अ. क्र. | सर्व्हे नं. | संपादनाचे क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| ६८ | २९/४/क | |
| ६९ | २९/४/ब | |
| ७० | २९/५/अ | |
| ७१ | २९/५/ब | |
| ७२ | २९/६ | |
| ७३ | ३३/१ | ०.३८.४८ |
| ७४ | ३३/२ | |
| ७५ | ३५/१/अ | ०.३९.१८ |
| ७६ | ३५/१/क/१ | |
| ७७ | ३५/१/क/२ | |
| ७८ | ३५/१/ब | |
| ७९ | ३५/२ | |
| ८० | ३५/३ | |
| ८१ | ३५/४/अ | |
| ८२ | ३५/४/ब | |
| ८३ | ३६/१/अ | ०.३५.३६ |
| ८४ | ३६/१/ब | |
| ८५ | ३६/२ | |
| ८६ | ३६/३/अ | |
| ८७ | ३६/३/ब | |
| ८८ | ३६/४ | |
| ८९ | ३६/५ | |
| ९० | ३९/१/अ | ०.४२.९७ |
| ९१ | ३९/१/ब | |
| ९२ | ३९/२/अ | |
| ९३ | ३९/२/क | |
| ९४ | ३९/२/ब | |
| ९५ | ३९/३/अ | |
| ९६ | ३९/३/ब | |
| ९७ | ३९/४ | |
| ९८ | ४०/१/अ | ०.७३.७५ |
| ९९ | ४०/१/क | |
| १०० | ४०/१/ब | |
| १०१ | ४०/२/अ | |
| १०२ | ४०/३ | |
| १०३ | ४०/६ | |
| १०४ | ४०/७ | |
| १०५ | ४०/८ | |
| १०६ | ४०/९ | |
| १०७ | ४०/१० | |
| १०८ | ४७/१ | ०.५२.०६ |
| १०९ | ४७/२ | |
| ११० | ४७/३ | |
| १११ | ४७/४ | |
| ११२ | ४७/५ | |
| ११३ | ४७/६ | |
| ११४ | ४७/७ | |
| ११५ | ४८/१ | ०.१७.२८ |
| ११६ | ४८/२ | |
| ११७ | ४८/३ | |
| ११८ | ४८/४ | |
| ११९ | ४८/५ | |
| १२० | ४८/६ | |
| १२१ | ४८/७ | |
| १२२ | ४८/८ | |
| १२३ | ४८/१० | |
| १२४ | ४८/१२ | |
| १२५ | ४८/१३ | |
| १२६ | ४८/१४ | |
| १२७ | ४९/१ | ०.०८.८२ |
| १२८ | ४९/२ | |
| १२९ | ४९/३ | |
| १३० | ४९/४ | |
| १३१ | ५०/१ | ०.५८.८१ |
| १३२ | ५०/२ | |
| १३३ | ५०/३ | |
| १३४ | ५०/४ | |
| १३५ | ५०/५ | |
| १३६ | ५०/६ | |
| १३७ | ५०/७ | |
| १३८ | ५०/८ | |
| १३९ | ५०/९/अ | |
| १४० | ५०/९/ब | |
| १४१ | ५०/१० | |
| १४२ | ५०/११ | |
| १४३ | ५०/१२ | |
| १४४ | ५०/१३ | |
| १४५ | ५०/१४ | |
| एकूण | | ५.८४.४० |

## अनुसूची- दोन
### सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

**प्रकल्पाचे नाव** प्रजिमा १११ ते भालीवाडी - सायडोंगर - १ उदंचन जलविद्युत प्रकल्प प्रस्तावित पोहोच रस्त्याचे बांधकाम तयार करणेसाठी.

**प्रकल्पकार्याचे वर्णन** मौजे भालिवडी, पोटल, आंबोट, सायडोंगर व पाली तर्फे कोतल खलाटी, ता. कर्जत जि. रायगड येथील जमिनीचे पोहोच रस्त्याचे बांधकाम करणे.

**समाजाला मिळणारे लाभ** कर्जत तालुक्यातील मौजे साई डोंगर येथे टोरेंट पॉवर मार्फत ३००० मेगावॉट चा उदंचन जल विद्युत प्रकल्प विकसित करण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे वीज भार व्यवस्थापन आणि शिखर मागणी पूर्ण करण्यासाठी साठवण क्षमता उपलब्ध करून महाराष्ट्र राज्यातील अक्षय ऊर्जेचा वाढता वाटा समर्थित होणार आहे. हा पूर्णतः हरित उर्जा प्रकल्प (Green Energy Project) आहे. सदर प्रकल्प दुर्गम भागात असल्याने प्रकल्पासाठी लागणारे बांधकाम साहित्य, इलेक्ट्रो-मेकॅनिकल पार्टस टर्बाइन, जनरेटर इत्यादींची वाहतुक करणे या प्रस्तावित रस्त्यामुळे शक्य होणार आहे. प्रस्तावित रस्त्याच्या ५.९११ कि.मी. लांबी ही प्रजिमा म्हणून दर्जान्नत करण्यात आलेली असून जलविद्युत प्रकल्पाशी तालुक्याला जोडणे सोईस्कर आहे. तसेच कर्जत तालुका हा पर्यटन तालुका म्हणून उदयोन्मुख होत आहे. सदर रस्त्यामुळे निसर्ग सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, साहसी उपक्रम, सांस्कृतिक व धार्मिक ठिकाणे, आरोग्य पर्यटन यासाठी भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी सुरक्षित, सोयीस्कर आणि जलद प्रवास शक्य होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

## अनुसूची- तीन

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :-** निरंक

## अनुसूची- चार

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश :-** महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग एक-कोकण विभागीय पुरवणी क्रमांक एसआयए-२०२६/प्र.क्र.३/कार्या-१, दि. २ जुलै २०२६ अन्वये उक्त अधिनियमाच्या कलम १० क खालील उक्त प्रकल्पाला उक्त अधिनियमाच्या प्रकरण- दोन आणि प्रकरण-तीन च्या तरतूदी लागू करण्यापासून लोकहितास्तव सूट देण्यात आली आहे.

## अनुसूची- पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :-** निरंक

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याने कायद्याच्या कलम ११ चे उप-कलम (१) खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), रायगड अलिबाग यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

टिप - उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन रायगड अलिबाग यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

अलिबाग,
दिनांक ९ जुलै २०२६.

**श्रीकांत गायकवाड**
उपजिल्हाधिकारी भूसंपादन
रायगड अलिबाग.

क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/६९/९२७/२०२६

## पान १ वरुन

### ऑक्टोबरमध्ये निवडणुका?

विशेष सखोल मतदार यादी पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच निवडणुका घेण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, वेळेत निवडणुका घेण्यासाठी आयोगाने १५ एप्रिल २०२६ रोजीची विधानसभा मतदार यादी ग्राह्य धरण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रशासनाच्या अनुभवावरून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर काही दिवसांतच निवडणूक कार्यक्रम जाहीर केला जातो. पावसाची परिस्थिती लक्षात घेता प्रत्यक्ष मतदान ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जंतर-मंतरवरील आंदोलनाला शेकापचा पाठिंबा

भविष्य, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि परीक्षा प्रक्रियेवरील जनविश्वास अबाधित राखण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केलेल्या मागण्यांवर केंद्र सरकारने गांभीर्याने विचार करून निष्पक्ष चौकशी करावी, अशी भूमिका शेकापने स्पष्ट केली.

अतुल म्हात्रे यांनी सांगितले की, भारतीय शेतकरी कामगार पक्ष संविधान, लोकशाही, सामाजिक न्याय, पारदर्शकता आणि जनहित या मूल्यांशी कायम कटिबद्ध असून, लोकशाही मार्गाने सुरू असलेल्या प्रत्येक शांततापूर्ण आंदोलनाला पक्षाचा नैतिक पाठिंबा राहणार आहे.

यावेळी केंद्र सरकारने आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेऊन लोकशाही संवादातून तोडगा काढावा आणि विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करावे, असे आवाहनही पक्षाने केले. महाराष्ट्रातून या आंदोलनाला मिळालेल्या पाठिंब्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जात असल्याची माहिती ॲड. रोशन पाटील (मुंबई उच्च न्यायालय) यांनी दिली.

### एमआयडीसीवर शेकापची धडक

म्हणण्यानुसार, पाणीपुरवठ्याचे कोणतेही नियोजन नसल्याने कधी पाणी येते, तर कधी अनेक दिवस नळ कोरडेच राहतात. पाणी आले तरी अत्यंत कमी दाबाने येत असल्याने अनेक घरांपर्यंत ते पोहोचत नाही. त्यातच जागोजागी झालेल्या अनधिकृत जोडण्यांमुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे.

या पार्श्वभूमीवर शेकापच्या शिष्टमंडळाने एमआयडीसीचे उपअभियंता सुभाष कुंभार यांची भेट घेत नागरिकांच्या तीव्र भावना त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. पाणीपुरवठ्याचे नियोजन तातडीने सुधारून चार दिवसांत नियमित व पुरेशा दाबाने पाणी देण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा हजारो महिलांसह हंडा मोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला. यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते तथा माजी तालुका चिटणीस अनिल पाटील, माजी उपसरपंच नरेश वर्तक, मंगेश वाळंज, रंजित तुणतुणे यांच्यासह परिसरातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### शिक्षणाधिकारीपदी संजय नाईकडे

जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता सुधारणे, शाळांमध्ये सेफ्टी ॲण्ड सिक्युरिटीश् कार्यशाळा आयोजित करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची काळजी घेणे, मूल्यवर्धन कार्यक्रमासारख्या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या मूल्यांची रुजवणूक करणे, अशा प्रकारचे विकसनशील उपक्रम राबविले आहेत. त्यांनी शुक्रवारी रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर शिक्षण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले

### केगाव ग्रामपंचायतीत अपहार

ग्रामपंचायतीत ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत असताना वैभव पाटील यांच्या कार्यकाळातील आर्थिक व्यवहारांमध्ये लाखो रुपयांच्या अनियमिततेचा संशय व्यक्त करण्यात आला होता. ग्रामनिधीचा कथित अपहार, निधीचा गैरवापर तसेच ग्रामपंचायतीच्या मूळ अभिलेखांमध्ये बनावट कागदपत्रांचा समावेश केल्याचे आरोप समोर आले होते. या गंभीर प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले होते.

मात्र, १८ सप्टेंबर २०१९ रोजी सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालात फौजदारी कारवाईची शिफारस न करता केवळ प्रशासकीय कार्यवाही सुरू असल्याचा उल्लेख करण्यात आला. हा अहवाल समाधानकारक नसल्याचे मानून वरिष्ठ स्तरावर तो अमान्य करण्यात आला. यानंतर १ जुलै २०२६ रोजी झालेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या प्रकरणाचा आढावा घेण्यात आला. प्राप्त तक्रारी आणि चौकशी अहवालाच्या आधारे वैभव पाटील यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी उरण गटविकास अधिकाऱ्यांना तातडीने वैभव पाटील यांच्याविरोधात फौजदारी गुन्हा दाखल करून त्याचा अहवाल जिल्हा परिषदेला सादर करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच आदेशाची अंमलबजावणी न झाल्यास संबंधित गटविकास अधिकाऱ्यांवरही शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

या निर्णयामुळे उरण तालुक्यासह पंचायत समिती आणि ग्रामपंचायत प्रशासनात मोठी खळबळ उडाली असून, या प्रकरणात पुढे कोणती कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### माणगावच्या विकासाला ब्रेक

शवदाहिनी बंद अवस्थेत आहे, तर नाट्यगृहाचे काम निधीअभावी अर्धवट पडले आहे. शहरासाठी अत्यावश्यक असलेले ट्रॉमा केअर हॉस्पिटल अद्याप सुरू झालेले नाही. मोठ्या अपेक्षेने उभारलेले क्रीडा संकुल देखभालीअभावी निष्क्रिय झाले असून, प्रस्तावित कोकण विभागीय क्रीडा संकुल माणगावऐवजी खारघरला गेल्याने युवकांमध्ये नाराजी आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी, अतिक्रमणे, रखडलेला बायपास, उघडी व तुंबलेली गटारे, दुर्गंधी, बंद डंपिंग ग्राउंड आणि अस्वच्छता या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. मच्छी, भाजी आणि फळ बाजाराची सुविधा नसल्याने विक्रेत्यांना उघड्यावर व्यवसाय करावा लागत आहे. वारंवार होणाऱ्या वीज खंडितीमुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी आणि रुग्णालये त्रस्त आहेत. अनेक वर्षांपासून स्वतंत्र विद्युत उपकेंद्राची मागणी होत असली तरी त्याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही.नगरपंचायत निवडणूक तोंडावर आली असताना पुन्हा विकासाच्या घोषणा सुरू झाल्या आहेत. मात्र, आश्वासनांचा पाऊस आणि प्रत्यक्ष कामांचा दुष्काळ यामुळे नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि पर्यटनाच्या दृष्टीने मोठी क्षमता असलेल्या माणगावला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रखडलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करावीत, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

### ...दोघांच्या आत्महत्या

मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. दुसरी घटना कराडे बुद्रुक येथे घडली. कमल दत्तात्रय भाऊ यांच्या चाळीत भाड्याने राहत असलेले राकेश राधेश्याम चव्हाण (२३, मूळ रा. वाराणसी, उत्तर प्रदेश) यांचा त्यांच्या राहत्या खोलीत मृत्यू झाल्याचे आढळून आले. त्यांनाही चौक ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. या दोन्ही प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस निरीक्षक अभिजीत भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली मृत्यूमागील कारणांचा अधिक तपास सुरू आहे.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे माजगांव, ता. खालापूर, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक योगेश यशवंत ढवाळकर यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ३९ | ६ | ०-१९-०० | ०-१९ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०७/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग,
तळ मजला, दिवाणी व फौजदारी
न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे शिर्कीचाळ, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाच्या जमिन मिळकतीच्या १ हे. -५३ आर. ४० चौ.मी. या एकुण क्षेत्रापैकी श्री. सचिन गजानन पाटील याच्या हिस्स्याच्या ० हे.-४० आर ०० चौ.मी. क्षेत्रापैकी ० हे. २० आर ०० चौ.मी. क्षेत्राची जमिन मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे-शिर्कीचाळ, ता. पेण, जि. रायगड येथील**

| मालक/कब्जेदाराचे नाव | भुमापन क्र. | उपविभाग | क्षेत्र हे.-आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| सचिन गजानन पाटील | ३६९ | - | १-५३.४० पैकी सचिन गजानन पाटील यांच्या हिस्स्याच्या ०-४०.०० क्षेत्रापैकी ०-२०.०० | ५.८० |

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतींसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील सचिन गजानन पाटील यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि. १८/०७/२०२६.

**श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
पत्ता : फ्लॅट नं. ए २, जय नगर को.ऑप हौ.सोसा.
लि. कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि. रायगड.
मोबाईल नं. ९३२५००४००८

# कलासक्त



वारकऱ्यांची आणि सेवेकऱ्यांची सेवा घडावी म्हणून आम्ही त्यांना एक दिवस भोजनाला बोलावतो. तेही प्रेमाने येतात आणि आमच्या सेवेचा मान राखून प्रसाद घेतात. हे वारकरी, सेवेकरी आमच्यासाठी प्रत्यक्ष माऊली आणि पांडुरंगच असतात. हीच भावना माऊलींशी आणि पांडुरंगाशी भेट घडल्याचं समाधान आणि पुण्याचा मुक्काम संपवून वारी पुढे मार्गस्थ झाल्यानंतर पुढच्या वर्षीपर्यंत या सेवेची आतुरतेने वाट पाहण्याचं सामर्थ्य देते.



# आषाढाचं आगमन आणि वारीचं प्रस्थान



**स्वानंद अयाचित**

यंदा अतितीव्र झळांनी भाजून काढणारा उन्हाळा अनुभवत असतानाच मोसमी पावसाचं आगमनही लांबलं. संपूर्ण जून महिना हुलकावणी दिल्यानंतर जुलैचा पहिला आठवडा सरताना पावसाने राज्यभर दमदार हजेरी लावली. जणू महिन्याभराचा अनुशेष भरून काढण्याच्या आवेशात वरूणराजा बरसला. आता तर पावसाची झड असणारा आषाढ सुरू झाला आहे. त्यामुळेच हा ओलाकंच महिना उत्तम पावसाचा असेल, अशी आशा करायला हरकत नाही. भरगच्च हिरवेपणा, संततधार, पाय पडला तर घसरण्याची भीती वाटावी इतक्या प्रमाणात साठलेले शेवाळे, चार-चार दिवस सुकवले तरी ओलसर राहणारे कपडे, साचलेपणाचा तो समृद्ध सुवास हीच तर आषाढाची खरी ओळख आहे. आषाढात पाऊस लयदार तरीही बेफाम असतो. त्या कोसळधारांमध्ये सातत्य असते. त्याचे आगळे देखणेपण असतो. सूर्यकिरणांची वाट अडवण्याची, आसमंतावर ओलेती झिलाई निर्माण करण्याचे, जमिनीतील रिते जलकुंभ काठोकाठ भरवून टाकण्याचे, प्रवाहमार्ग प्रवाहित करण्याचे, धबधब्यांना अनिवार ओढीने दरीत उडी घेण्यास भाग पाडण्याचे कसब आणि ताकद त्याच्यामध्ये आहे. म्हणूनच आषाढातला पाऊस दमदार भासतो. त्याचा आवेग अनुभवण्याजोगा असतो. उडत्या पक्ष्यांना आणि हुंदडणाऱ्या पशूंनाही चिडीचूप होत आडोसा शोधायला लावण्याचे सामर्थ्य त्याच्या दिमाखदार कोसळण्यात असते. तीदेखील निमूटपणे त्याचा आदेश पाळतात आणि आधीच बांधून ठेवलेल्या घरट्यांमध्ये वा शोधलेल्या आडोश्यामध्ये आसरा घेत बाहेरचे जलसुक्त शांतपणे ऐकत राहतात. खरे सांगायचे तर आषाढातल्या अतिवृष्टीत वेडे धाडस करणाऱ्या अतिउत्साही पर्यटकांनी त्यांच्यापासून तरी धडा घेणे गरजेचे आहे.

एकंदरच हा ओलाचिंब महिना येणाऱ्या समृध्दीची पेरणी करणारा असतो. शेताशिवारात पेरलेलं बी-बियाणं रुजण्यासाठी आभाळीच्या जलधारांचं सिंचन कामी येत असतं. या काळ्या आईच्या अंगावरील मुरमाड भेगाळलेपण कमी होत असल्याने जीव भांड्यात पडलेला असतो. बहरु पाहणाऱ्या या ऋतूपर्वात भक्तीला धुमारे फुटले नाहीत तरच नवल! दुसरीकडे याचीही सज्जता सुरू असते. गावोगावीचे वारकरी भागवत धर्माची पताका नाचवत आनंदाने पंढरीच्या वाटेवर चालत असतात. असंख्य भक्तगणांनी उच्चरवात केलेला हा विठूचा जागर आपल्याही मनात घुमत असतो. एक प्रकारे ही सणांच्या आगमनाची सज्जताच असते. दर वर्षी याच भारलेपणाने आषाढ साजरा होतो. पावसाच्या धारांसोबत भक्तिरसाचा बाज आणि टाळमृदुंगाचा आवाज घेऊन येणारी आषाढीची वारी म्हणजे गेल्या साडेसातशे वर्षांपासून चालत आलेला अद्भूत संघटनाचा एक विलक्षण चमत्कार आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो लोक भारावल्या मनाने आणि विठ्ठलभेटीच्या ओढीने पंढरपूरला जातात. हे आजतागायत अखंड सुरू असलेले लोकशक्तीचे आणि ईश्वरभक्तीचे आगळेवेगळे रूप आहे. आषाढी वारीमागे असलेले भागवत धर्माचे तत्वज्ञान, त्यामागील तत्कालीन भूमिका, भक्तीचा वाहणारा महापूर, ते रिंगण, मन प्रसन्न करून टाकणाऱ्या ज्ञानेश्वर आणि तुकोबारायांच्या पालख्या, संपूर्ण वातावरणाला भारून टाकणारे पावित्र्य, ग्यानबा तुकारामचा घोष, कित्येक किलोमीटरचे अंतर अथक पायी चालत जाणारे लाखो वारकरी, देवाच्या चरणाशी आपल्या सेवेचा खारीचा वाटा उचलण्यासाठी तयार असलेले अगणित सेवेकरी हे सगळे उभा महाराष्ट्र गेली ७५० वर्षं अनुभवतो आहे.

ज्ञानेश्वर माऊलींची आळंदीहून निघालेली पालखी पुणे, सासवड, जेजुरी, वेल्हे करत वाखरीला आणि तिथून पंढरपूरला पोहोचेल. देहूहून निघालेली तुकाराम महाराजांची पालखीदेखील पंढरपूरला पोहोचेल. या दोन महत्वाच्या पालख्यांबरोबरच इतर सर्व संतांच्या मानाच्या पालख्या त्या त्या गावापासून निघतात आणि वाटेत मुख्य पालख्यांमध्ये सामील होतात. त्यात पैठणहून संत एकनाथमहाराज, त्र्यंबकेश्वरहून संत निवृत्तीमहाराज, संत मुक्ताबाई, माता रुक्मिणी आणि इतर सुमारे २३ संतांच्या पालख्या असतात. सुमारे तीन आठवड्यांची ही पदयात्रा अनेक गावे आणि शहरे ओलांडत पंढरपूरला पोहोचते. संत तुकाराम महाराजांच्या पालखीसोबत ३२९ दिंड्या असतात तर माऊलींच्या पालखीसोबत ४५० दिंड्या असतात. प्रत्येक दिंडीत दोनशेपासून हजार- पंधराशे वारकरी असतात. या दिंड्यांबरोबर जाणाऱ्या हजारो लोकांसोबत 'मुक्त' वारकरीही असतात आणि त्यांची संख्याही तितकीच असते. याचाच अर्थ सुमारे दीड लाखांच्या आसपास भक्तगण पंढरीला जातात. अर्थातच, या इतक्या लोकांची सर्व प्रकारची व्यवस्था म्हणजे खाणे-पिणे, रात्रीचा मुक्काम आणि नित्यविधीची सोय करणे हे अत्यंत कठीण काम आहे. पण पांडुरंगाच्या भेटीसाठी आतुर झालेल्या भक्तांना कुठेही गैरसोय जाणवत नाही. या वारकरी पंथाशी आमच्या कुटुंबाचं विलक्षण नातं जडलं आहे. माऊली, पंढरीची वारी आणि अयाचित कुटुंबियांचा ऋणानुबंध गेल्या किमान चार पिढ्यांचा आहे. अयाचित कुटुंब सातारा जिल्ह्यातील पुसेसावळी या गावचे.

माऊलींनी समाधीच्या वेळी बरोबर घेतलेल्या काठीचा अजानवृक्ष झाला. या वृक्षाची मुळे माऊलींच्या नाकाला स्पर्श करत असल्याचे त्या काळी समोर आले तेव्हा पूर्वजांनी त्या वृक्षाची मुळे आणून घराच्या मागच्या बाजूला लावली. त्याचा खूप मोठा विस्तार झाला असून देशभरातून अनेक लोक तो पहायला येतात. पण त्या काळापासून आमचं माऊलींशी खूप जवळचं नातं निर्माण झालं आहे. पुसेसावळीला दर वर्षी गोकुळाष्टमीच्या वेळी सात दिवसांचा सप्ताह साजरा केला जातो. ज्ञानेश्वर माऊलींची जन्मतिथीही गोकुळाष्टमीच असल्यामुळे हा सप्ताह त्यावेळी आयोजित केला जातो. या सात दिवसांमध्ये ज्ञानेश्वरीचं पारायण केलं जातं. त्यात एक दिवस वड्या-रोट्यांचं जेवण असतं. तो रुक्मिणीच्या डोहाळे जेवणाचा सोहळा असतो. त्यानंतर एक दिवस काल्याचं कीर्तन आणि काल्याचा महाप्रसाद असतो. हा सप्ताह मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. तिथल्या पंचक्रोशीतले नागरिक आवर्जून प्रसाद घेण्यासाठी उत्सवाला हजेरी लावतात. दुसरा उत्सव म्हणजे माउलींचा समाधी दिन. त्यात काकड आरती, भजनाचा कार्यक्रम महाप्रसाद आणि काला असतो. तिसरा उत्सव म्हणजे एकनाथ षष्ठी. गेल्या अनेक पिढ्यांपासून ही परंपरा चालत आली आहे.

माऊलींच्या ऋणानुबंधामुळे आम्ही वारकरी संप्रदायाशीही आपसूकच जोडले गेलो. आमच्या डोक्यात नेहमी माऊलींचाच विचार असतो. परंतु वारीचा विषय येतो तेव्हा एक वेगळीच ओढ लागलेली असते, ती पांडुरंगभेटीची. आम्हाला पांडुरंग वारकऱ्यांच्या वेशात भेटतो. इतर सर्व कामं आणि व्याप बाजूला ठेऊन केवळ माऊली आणि पांडुरंगाची सेवा करण्याची इच्छा होते. दर वर्षी आळंदीहून निघणाऱ्या वारीमध्ये वारकऱ्यांबरोबर सेवेकरीही माऊलींच्या सोबत असतात. त्यांचा पहिला मुक्काम पुण्यात असतो. या मुक्कामात आपल्याकडून वारकऱ्यांची आणि सेवेकऱ्यांची काहीतरी सेवा घडावी या हेतूने आम्ही त्यांना एक दिवस भोजनाला बोलावतो. तेही प्रेमाने येतात आणि आमच्या सेवेचा मान राखून प्रसाद घेतात. त्यावेळी आम्हाला पंचपक्वान्नेच हवीत किंवा अमूकच जेवण हवे, असा त्यांचा कोणताही हट्ट किंवा आग्रह नसतो. आमची सेवा ते नेहमीच गोड मानून घेतात. हे वारकरी आणि सेवेकरी आमच्यासाठी प्रत्यक्ष माऊली आणि पांडुरंगच असतात. हीच भावना आमची माऊलींशी आणि पांडुरंगाशी भेट घडल्याचं समाधान आणि पुण्याचा मुक्काम संपवून वारी पुढे मार्गस्थ झाल्यानंतर पुढच्या वर्षीपर्यंत या सेवेची आतुरतेने वाट पाहण्याचं सामर्थ्य देते.

**(लेखक वारकरी संप्रदायाचे पाईक आहेत.)**

# सुपरस्टार राजेश खन्ना



**श्याम ठाणेदार**

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे ज्येष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज चौदावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धेकरिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धेत त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटानंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचशा मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.

''बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपना...जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता.....''आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....''

**राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!**



# 'ड्रिमर' ते बॉलिवूडची 'क्वीन'

कियारा अडवाणीची स्टोरी म्हणजे 'हार्ड वर्क' आणि 'पॅशन'चा परफेक्ट संगम आहे! आज स्क्रीनवर लिलया भूमिका साकारणारी कियारा एकेकाळी तिच्या आईच्या शाळेत नर्सरी टीचर म्हणून काम करायची. पण 'थ्री इडियट्स' पाहिला आणि तिने ठरवले, मलाही इथेच पोहोचायचंय! सलमान खानच्या सल्ल्याने तिने 'आलिया' हे आपलं जुनं नाव बदलून रुपेरी पडद्यासाठी 'कियारा' हे नाव स्विकारलं. तिचं पदार्पण 'फगली' (२०१४) मधून झालं. तो बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला. पण तिने हार मानली नाही. 'एम.एस. धोनी: द अनटोल्ड स्टोरी'मधील साक्षी धोनीची भूमिका तिच्या करिअरचा 'टर्निंग पॉइंट' ठरली. त्यानंतर 'कबीर सिंग'ची प्रिती असो किंवा 'शेरशाह'मधील डिंपल, तिने प्रत्येक भूमिकेत स्वतःला सिद्ध केलंय. नर्सरी स्कूल ते सिद्धार्थ मल्होत्रासोबतची शाही लग्नगाठ आणि आज बॉलिवूडमधील टॉप स्टार - कियाराचा प्रवास हा तरुणाईसाठी एक मोठा धडा आहे की, स्वप्न पाहण्याची हिम्मत असेल, तर यश नक्कीच मिळतं!

सनी देओल आणि अक्षय खन्ना यांची दमदार जोडी 'इक्का'मधून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. सस्पेन्स, ॲक्शन, थरार आणि अनपेक्षित ट्विस्टने भरलेला ट्रेलर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. अक्षय खन्नाचा प्रभावी लूक आणि सनी देओलचा दमदार स्क्रीन प्रेझेन्स तरुण प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण करत आहे.

ओटीटीवर नवा थरार अनुभवण्याची वाट पाहणाऱ्यांसाठी 'इक्का' ही सर्वाधिक चर्चेतील आगामी कलाकृती ठरत आहे. ट्रेलरमधील दमदार संवाद, वेगवान कथानक आणि रहस्यमय वातावरणामुळे चित्रपटाबाबतची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत असून, प्रदर्शित होताच तो चर्चेचा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# 'इक्का'च्या ट्रेलरने उडवली खळबळ



# बालांगण



## मस्त मॅसेडोनिया

सफर देशांची

मॅसेडोनिया हा दक्षिण-पूर्व युरोपमधला देश आहे. एके काळी इथे राजेशाही होती. मॅसेडोनियन साम्राज्य बऱ्याच मोठ्या भूभागावर पसरलं होतं. मात्र आता या देशाचा आकार बराच छोटा आहे. पर्वत, तलाव, झाडं आणि विविध प्रजातींचे प्राणी ही या देशाची ओळख बनली आहे. स्कॉप्जे ही मॅसेडोनियाची राजधानी. बल्गेरिया, ग्रीस, सर्बिया आणि अल्बानिया हे याचे शेजारी देश. मॅसेडोनिया हा चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला देश आहे. माउंट कोराब हे या देशातलं सर्वात उंच शिखर. या देशात मोठ्या टेकड्या, खोल दऱ्या आणि त्याच्या सभोवताली पर्वतरांगा असं निसर्गसौंदर्य पहायला मिळतं. देशात पाण्याचे ११०० पेक्षा जास्त स्रोत आहेत. यात ओहरिड, प्रेस्पा, डोइरॅन अशा तलावांचा समावेश आहे. ब्रॅगॅल्निका, सिरना आणि वरदार या इथल्या प्रमुख नद्या आहेत. वरदार नदी या देशाच्या मधून वाहत ग्रीसपर्यंत जाते.

मॅसेडोनियातलं तापमान सौम्य स्वरुपाचं असतं. इथे विविध प्रजातींचे प्राणी आणि झाडंझुडपं पहायला मिळतात. या देशात तीन राष्ट्रीय उद्यानं आणि संरक्षित प्रकल्प आहेत. अस्वलं, हरणं आणि लांडगे देशाच्या डोंगराळ भागात फिरताना दिसतात. या देशात झाडांच्या ३५०० पेक्षा अधिक प्रजाती पहायला मिळतात. या देशाला प्राचीन वारसा लाभला आहे. इसवीसनपूर्व ८०८ मध्ये कॅरॅनसने मॅसेडोनियाचं साम्राज्य प्रस्थापित केलं आणि संपूर्ण युरोपभर पसरवलं. दुसऱ्या फिलिपने मॅसेडोनियाच्या सर्व शेजाऱ्यांचा पराभव केला. अलेक्झांडर द ग्रेट हा फिलिपचा मुलगा. त्याने संपूर्ण जगावर राज्य केलं. मात्र त्याच्या मृत्यूनंतर या साम्राज्याची वाताहत झाली. विविध युरोपियन देशांनी या देशावर राज्य केलं. १९९१ मध्ये या देशाला युगोस्लाव्हियाकडून स्वातंत्र्य मिळालं.

## मनोरंजक बीच क्रिकेट

फन टाइम

आम्ही बीचवर गेल्यावर क्रिकेट खेळत असाल. वाळूमध्ये क्रिकेट खेळण्याची मजा काही वेगळीच असते. तुम्ही गंमत म्हणून बीच क्रिकेट खेळता. पण इंग्लंडमध्ये बीच क्रिकेटची स्पर्धा रंगते. या स्पर्धेचे नियम सहभागी होणारे संघ ठरवतात. दर वर्षी इथे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. मे ते सप्टेंबर या काळात बीच क्रिकेट स्पर्धा रंगते. शीप इन क्लबतर्फे या स्पर्धेचं आयोजन केलं जातं.



ब्रिटनमध्ये या एकाच क्लबकडे बीच क्रिकेटचं पीच आहे. हे पीच समुद्राच्या लाटेत वाहून जातं. मग दोन ते तीन दिवसांनी रोलर फिरवून नवं पीच तयार करावं लागतं. वेस्ट इंडिजमध्ये समुद्रकिनारे असल्यामुळे बीच क्रिकेट खेळलं जातं. तिथूच ही संकल्पना ब्रिटनमध्ये पोहोचली. बीच क्रिकेट स्पर्धेचे नियम गल्ली क्रिकेटसारखेच असतात. या स्पर्धेत वाईड आणि नो बॉल दिला जात नाही. ही स्पर्धा मनोरंजनासाठी भरवली जात असल्याने कोणीही यात सहभागी होऊ शकतो. इथे खेळाडूंना स्वत:च धावसंख्या लक्षात ठेवायची असते. प्रत्येक बॉलनंतर ओरडून स्कोअर सांगावा लागतो. बरेचदा फलंदाजालाच लांब गेलेला बॉल घेऊन यावा लागतो. फिल्डरने एका हाताने झेल घेतला तर फलंदाजी करणाऱ्या संघाचा डाव संपतो. विकेट्स आणि ओव्हर उरल्या असल्या तरी त्यांना डाव संपवावा लागतो. तर अशी ही भन्नाट बीच क्रिकेट स्पर्धा खेळावीशी वाटतेय ना?

## कार्टूनचे पपेट्स

करून तर बघा

तुम्हाला पपेट्स माहीत आहेत ना? पपेट्स म्हणजेच बोलक्या बाहुल्या. विविध आकारांचे पपेट्स बोटात घालून त्यांचा आवाज काढून खेळायला खूपच गंमत वाटते. असे पपेट्स तुम्ही बनवू शकता. तुमच्या आवडत्या प्राण्यांचे, कार्टून्सचे पपेट्स बनवून मित्रमंडळींसोबत तुम्ही छान छान खेळही खेळू शकता.

**साहित्य :** आईस्क्रिमच्या काड्या, सुती किंवा लोकरी कापड, डोळे आणि गम.

**कृती :** * सर्वात आधी सुती किंवा लोकरी कापडापासून विविध आकार कापून घ्या. तुम्हाला प्राण्यांच्या शरीराचे दोन एकसारखे आकार लागतील. यासोबतच कान, नाक आणि इतर अवयवांचे हवे तसे आकार कापून घ्या. * प्राण्यांच्या शरीरावर तुम्ही कान चिकटवून घ्या. मग कापडाच्या उलट्या बाजूला कडेने गम लावून घ्या. त्यानंतर काडीला गम लावून ती मध्यभागी चिकटवा. * त्यानंतर दोन सारख्या आकारांपैकी दुसरा आकार कडेला गम लावलेल्या भागावर नीट दाबून चिकटवा. * मग डोळे, नाक, हात, पाय तसंच अन्य काही अवयव असतील तर ते चिकटवून घ्या. उंदीर, मांजर, वाघ अशा प्राण्यांना तुम्ही मिशा चिकटवू शकता. यासाठी काळा दोरा



किंवा वेल्वेट पेपरचा वापर करता येईल. * अशा प्रकारे कल्पनाशक्ती लढवून तुम्ही वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी, पक्षी तयार करू शकता. * हे पपेट्स तयार केल्यानंतर तुम्ही प्राण्यापक्ष्यांचे आवाज काढून पपेट शो सादर करू शकता.

## स्टब्स... महापौर मांजर!

अद्भुताचे अंतरंग

एखाद्या गावाचा महापौर म्हणजे सूट-बूट घालणारा, सभा घेणारा आणि महत्त्वाचे निर्णय घेणारा माणूस असेच आपल्याला वाटते. पण अमेरिकेतील एका छोट्याशा गावात तब्बल वीस वर्षे एक मांजर महापौर म्हणून प्रसिद्ध होते.

या अनोख्या मांजराचे नाव होते स्टब्स. स्टब्सचा जन्म १९९७ मध्ये झाला. स्टब्स म्हणजे केशरी-तपकिरीरंगाचे, मध्यम आकाराचे आणि अतिशय गोंडस मांजर होते. अमेरिकेतील टालकीटना हे एक सुंदर पर्वतरांगांनी वेढलेले गाव आहे. गावातील काही लोक स्थानिक राजकारण्यांवर नाराज होते. गंमत म्हणून त्यांनी स्टब्सला महापौर म्हणायला सुरुवात केली. हळूहळू स्टब्स गावाचे प्रतीकच बनला. त्याची शेपटी खूपच लहान असल्याने त्याचे नाव टस्टब्स पडले. त्या शेपटीमुळेच तो इतर मांजरांपेक्षा वेगळा ओळखू येत असे.खरे तर स्टब्स कोणत्याही निवडणुकीत जिंकला नव्हता. त्याच्याकडे कोणतेही सरकारी अधिकार नव्हते. तो कर ठरवत नव्हता. कायदे करत नव्हता किंवा बैठका घेत नव्हता. तरीही जगभरातील लोक त्याला मेयर स्टब्स या नावाने ओळखू लागले.




स्टब्सचा दिवसही अगदी खास असायचा. तो गावातील एका दुकानात किंवा कार्यालयात आरामात बसलेला दिसायचा. पर्यटक त्याच्याबरोबर फोटो काढण्यासाठी रांगा लावत. त्यामुळे गावाच्या पर्यटनालाही मोठी मदत झाली. स्टब्साबद्दल वृत्तपत्रांत, दूरचित्रवाणीवर आणि इंटरनेटवर बातम्या प्रसिद्ध होऊ लागल्या.

एकदा त्याच्यावर एका कुत्र्याने हल्ला केला आणि तो जखमी झाला. पण उपचारानंतर तो पुन्हा ठणठणीत बरा झाला. सुमारे वीस वर्षे स्टब्स टालकीटनाचे आकर्षण राहिला. २०१७ मध्ये त्याचे निधन झाले. जगभरातून त्याला श्रद्धांजली वाहण्यात आली. एका साध्या मांजराने इतके प्रेम आणि प्रसिद्धी मिळवणे आणि एका गावचा महापौर म्हणून मान मिळवणे ही खरोखरच अद्भुत गोष्ट आहे.

दोस्त हे मस्त

### कासवांच्या जगात



आज आपण कासवाविषयी माहिती घेऊ. कासवाच्या पाठीवरचं कवच खूप टणक असतं. त्यावर दगड मारला तरी कासवाला काहीच त्रास होत नाही. हे कवच त्यांच्या शरीराचा भाग असल्याने काढता येत नाही. कासवाच्या तोंडात दात नसतात. त्याऐवजी पातळ चकतीसारखं हाड असतं. त्याचा वापर ते खाण्यासाठी करतात. जमिनीवर रहाणारी आणि पाण्यातली अशी दोन प्रकारची कासवं असतात. जमिनीवरची बरीच कासवं शाकाहारी असतात तर पाण्यातली कासवं छोटे मासे किंवा पाण्यात रहाणारे छोटे जीव जंतू खातात.

खादाडी

### कॉलिफ्लॉवर पकोडे

तुम्ही फ्लॉवरचा वापर करून एक मस्त पदार्थ बनवू शकता. कॉलिफ्लॉवर पकोडे असं या पदार्थाचं नाव. यासाठी फ्लॉवरचे छोटे तुकडे घ्या. पाऊण वाटी मैदा घ्या. २ टेबलस्पून टॉमेटो सॉस, अर्धी वाटी ताक, दोन कप ब्रेडचा चुरा आणि मीठ असे पदार्थ जमवा.



एका मोठ्या भांड्यात ताक, मैदा, टोमॅटो सॉस आणि मीठ घाला. मिश्रण एकत्र करा. या मिश्रणात फ्लॉवरचे तुकडे घाला. ते ब्रेडच्या चुऱ्यात घोळा. कढईत तेल गरम करा. फ्लॉवरचे तुकडे लालसर रंगावर तळून घ्या. कॉलिफ्लॉवरचा चटपटीत अवतार तयार आहे.

घ्या काळजी

### नेलपॉलिश लावताय?

मुली वरचेवर नेलपॉलिश लावतात. पण मुलींनो, तुमची नखं खूप नाजूक असतात. सतत नेलपॉलिश लावल्यामुळे नखं कोरडी होतात. पिवळी पडू लागतात.



नेलपॉलिश मधल्या रासायनिक घटनांमुळे आपल्याला आजार होऊ शकतात. त्यामुळे एखादा कार्यक्रम असेल तेव्हाच नेलपॉलिश लावा. शक्यतो उजव्या हाताच्या नखांना नेलपॉलिश लाऊ नका. यामुळे तुमची नखं आणि आरोग्य दोन्ही चांगलं राहिल.

योगा टाईम

### असं आहे चक्रासन

चक्रासन करण्यासाठी जमिनीवर झोपा. दोन्ही पाय दुमडून घ्या. आता हातांचे दोन्ही पंजे खांद्याखाली ठेवा. दीर्घ श्वास घ्या. श्वास सोडताना शरीराचा कंबरेखालचा भाग वर उचला. पुन्हा श्वास घेऊन वरचा भागही वर उचला.



६० ते ९० सेकंद या स्थितीत रहा. मग श्वास सोडताना पहिल्यांदा कंबरेखालचा भाग जमिनीला टेकवा आणि वरचा भाग खाली आणा.

## ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांग

माहिती पर्वतरांगांची

ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांगही आफ्रिका खंडातील सर्वात सुंदर आणि वैशिष्ट्यपूर्ण पर्वतरांगांपैकी एक मानली जाते. ही पर्वतरांग प्रामुख्यानेदक्षिण आफ्रिकाआणिलेसोथोयांच्या परिसरात पसरलेली आहे. ड्रॅकेन्सबर्ग हा शब्द डच भाषेतून आला असून त्याचा अर्थ ड्रॅगनचे पर्वतअसा होतो. उंच, खडकाळ आणि धुक्याने वेढलेली शिखरे पाहून सुरुवातीच्या युरोपीय प्रवाशांना ती एखाद्या विशाल ड्रॅगनच्या पाठीसारखी वाटली. म्हणून यापर्वतरांगेला ड्रॅकेन्सबर्ग म्हणू लागले.

ही पर्वतरांग सुमारे १,००० किलोमीटर लांब आहे. तिची उंच शिखरे, खोल दऱ्या, भव्य कडे आणि हिरवीगार कुरणे यांमुळे ती जगभर प्रसिद्ध आहे. या पर्वतरांगेतील सर्वात उंच शिखर म्हणजेथाबाना एन्टलेन्याना. त्याची उंची सुमारे ३,४८२ मीटर आहे आणि ते दक्षिण आफ्रिकेच्या संपूर्ण प्रदेशातील सर्वोच्च शिखर मानले जाते.



ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांग जलस्रोतांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे. या पर्वतांमध्ये पडणाऱ्या पावसामुळे अनेक नद्या निर्माण होतात. विशेषतःऑरेंज नदीआणिटुगेला नदीयांसारख्या नद्यांना येथे उगम मिळतो. त्यामुळे दक्षिण आफ्रिकेतील लाखो लोकांना पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध होते. ड्रॅकेन्सबर्गमधील टुगेला धबधबाहा जगातील सर्वात उंच धबधब्यांपैकी एक मानला जातो. त्याची एकूण उंची सुमारे ९४८ मीटर आहे. त्यामुळे ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांग केवळ पर्वतांसाठीच नव्हे तर भव्य धबधब्यांसाठीही प्रसिद्ध आहे.या पर्वतरांगेत विविध प्रकारच्या वनस्पती आणि प्राणी आढळतात. उंच गवताळ प्रदेश, दुर्मिळ फुले आणि अनेक स्थानिक वनस्पती येथे वाढतात. गरुड, गिधाडे, हरिणे, बबून आणि इतर वन्यजीव येथे आढळतात. जैवविविधतेमुळे हा प्रदेश पर्यावरणशास्त्रज्ञांसाठी विशेष महत्त्वाचा आहे.ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांगेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथील प्राचीन गुहाचित्रे. हजारो वर्षांपूर्वी येथे राहणाऱ्यासान-बुशमेन लोकांनी गुहांच्या भिंतींवर प्राणी, शिकारी आणि धार्मिक विधी यांची चित्रे काढली होती. अशी हजारो चित्रे आजही जतन केली गेली आहेत. या ऐतिहासिक आणि नैसर्गिक महत्त्वामुळेउखालाम्बा-ड्रॅकेन्सबर्ग पार्कया प्रदेशाला यूनेस्कोकडून जागतिक वारसा स्थळाचा दर्जा मिळाला आहे. आज येथे गिर्यारोहण, ट्रेकिंग, कॅम्पिंग, पक्षीनिरीक्षण आणि निसर्गभ्रमंतीसाठी जगभरातून पर्यटक येतात.भव्य खडकाळ कडे, उंच धबधबे, हिरवीगार कुरणे, दुर्मिळ वन्यजीव आणि हजारो वर्षांचा मानवी इतिहास यांचा संगम ड्रॅकेन्सबर्ग पर्वतरांगेत पाहायला मिळतो. त्यामुळे ती आफ्रिकेतील महत्त्वाच्या पर्वतरांगांपैकी एक मानली जाते.

## कॅलेंडर्सची धमाल दुनिया

तुमच्या घरात भिंतीवर नवं कोरं कॅलेंडर दिमाखात लागलं असेल. तुम्हाला माहितेय, जगात वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी नववर्ष साजरं होतं. अर्थातच त्यानुसार कॅलेंडर्सचेही वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात. भारतातच जवळपास ५० प्रकारची कॅलेंडर्स पाहायला मिळतात.

माहीत आहे?

* ग्रेगोरियन कॅलेंडर - हे कॅलेंडर जगभर प्रसिद्ध आहे. पोप ग्रोगरी (१३वे) यांनी १५८२ मध्ये या कॅलेंडरची निर्मिती केली.









* भारतामध्ये विक्रम संवत, शक संवत, हिजरी संवत, फसली संवत, बांगला संवत, बौद्ध संवत, जैन संवत, खालसा संवत, तमिळ संवत, मल्याळम संवत, तेलगू संवत आदी प्रचलित आहेत.

* विक्रम संवत गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्यानं उज्जनीच्या शकांना पराजित केल्याच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू केलं. हे वर्ष चैत्र महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेपासून सुरू होतं.

* शक संवतला शालिवाहन शकही म्हणतात. शक सम्राट कनिष्क यानं इ.स. पूर्व ७८ मध्ये सुरू केलं.

* रोमन कॅलेंडर जगातील सर्वात पहिलं कॅलेंडर समजलं जातं. यानुसार मार्चमध्ये नववर्ष सुरू होतं.

* हिजरी कॅलेंडर हे इस्लाम मधील हिजरी वर्षाच्या नावानं सुरु झालेलं कॅलेंडर आहे. या कॅलेंडरनुसार नवीन वर्ष मोहरमच्या महिन्यापासून सुरू होतं.

* आपला शेजारी देश असणारा चीनमध्येही वेग-वेगळी कॅलेंडर बघायला मिळतात.

## गरज रेनडिअर्स वाचवण्याची

प्राणी जगत

रेनडिअर या प्राण्याबद्दल तुम्ही ऐकलं असेलच. गायीसारख्या दिसणाऱ्या या प्राण्याला भलीमोठी शिंगं असतात. पण हा प्राणी हरणाच्या जातीचा आहे. तर जाणून घेऊया रेनडिअरबद्दल...

रेनडिअर उत्तर युरोप, उत्तर अमेरिका, आशिया आणि ग्रीनलॅण्ड या भागात आढळतात. या भागात बर्फ पडायला लागल्यानंतर रेनडिअर कळपा-कळपाने दक्षिणेकडे स्थलांतरित होतात. या भागात ते निवारा शोधतात. अन्न मिळवण्यासाठी शिंगाच्या सहाय्याने खोदकाम करतात.



त्यांच्या शिंगात खूप शक्ती असते. त्यामुळे बर्फवृष्टी झाली तरी बर्फ खोदून ते आपलं अन्न शोधू शकतात.

रेनडिअर हिवाळ्यात दक्षिणेकडे जातात त्याचप्रमाणे उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे स्थलांतरित होतात. त्यांचं स्थलांतर पृथ्वीवरचं सर्वात मोठं स्थलांतर आहे. या काळात ते जवळपास ६०० मैल म्हणजेच ९६५ किलोमीटर अंतर पार करतात. टुंड्रा प्रदेशात मिळणारं गवत, मशरूम आणि वनस्पती हे त्यांचं उन्हाळ्यातलं अन्न असतं. रेनडिअर हिवाळ्यात दक्षिणेकडे स्थलांतरित होतात तर उन्हाळ्यात पुन्हा उत्तरेकडे येतात. वर्षभराच्या काळात ते तब्बल १६०० मैल म्हणजेच २,५७४ किलोमीटरचं अंतर पार करतात. एक प्रौढ रेनडिअर दिवसाला पाच किलो अन्न फस्त करतो.

रेनडिअरची मोठ्या प्रमाणावर शिकार झाली आहे. त्यामुळेच वूडलॅण्ड रेनडिअरचा समावेश धोकादायक प्रजातींमध्ये झाला आहे. पण इतर रेनडिअरची संख्या मात्र स्थिर आहे. त्यामुळे वूडलॅण्ड रेनडिअरची शिकार थांबवण्याची गरज आहे. रेनडिअर साधारणपणे पंधरा वर्षे जगतात.

## ओझोन : पृथ्वीचा संरक्षक

रंजक विज्ञान

पृथ्वीभोवती असलेल्या अनेक वायूंच्या आवरणाला वातावरण म्हणतात. वातावरणाच्या वरच्या भागात, जमिनीपासून साधारण १५ ते ३५ किलोमीटर उंचीवरओझोन वायूचा एक विशेष थरअसतो. यालाचओझोन थरम्हणतात. हा थर पृथ्वीसाठी एका अदृश्य छत्रीसारखे काम करतो. सूर्यापासून येणाऱ्या किरणांमध्ये काही अतिनील म्हणजेच अल्ट्राव्हायोलेटकिरण असतात. हे किरण जास्त प्रमाणात पृथ्वीवर पोहोचले तर माणसे, प्राणी आणि वनस्पती यांना हानी पोहोचू शकते. त्वचेचे आजार, डोळ्यांचे विकार आणि पिकांचे नुकसान होण्याची शक्यता वाढते. सुदैवाने ओझोन थर या धोकादायक किरणांपैकी बरेच किरण शोषून घेतो. त्यामुळे पृथ्वीवरील जीवन सुरक्षित राहते.मात्र काही दशकांपूर्वी शास्त्रज्ञांच्या लक्षात आले की ओझोन थर काही ठिकाणी पातळ होत आहे.



विशेषतः दक्षिण ध्रुवाजवळील अंटार्क्टिका प्रदेशावर मोठ्या प्रमाणात ओझोनचे प्रमाण कमी झाले होते. यालाच लोक ओझोन होल म्हणजेच ओझोनमधील भोक असे म्हणू लागले.मानवनिर्मित रसायनांमुळेहे घडत होते. फ्रिज, एअर कंडिशनर आणि काही स्प्रे उत्पादनांमध्ये क्लोरोफ्लुरोकार्बन ही रसायने असतात. ही वातावरणात पसरल्यामुळे ओझोनचे नुकसान करतात. हे लक्षात आल्यानंतर जगातील अनेक देशांनी एकत्र येऊन या रसायनांच्या वापरावर निर्बंध घातले. त्यामुळे आज ओझोन थर हळूहळू पूर्ववत होऊ लागला आहे. ओझोन थरातील बदलांचा हवामानावरही काही प्रमाणात परिणाम होतो. ओझोनचे प्रमाण कमी झाले तर वातावरणातील उष्णतेचे वितरण बदलू शकते. काही भागांतील वाऱ्यांचे स्वरूप आणि पावसाचे चक्र यावर परिणाम होऊ शकतो. खरे तर ओझोन थरातील घट आणिजागतिक तापमानवाढ या दोन वेगळ्या समस्या आहेत.

जागतिक तापमानवाढ मुख्यतः कार्बन डायऑक्साइड, मिथेन आणि इतर हरितगृह वायूंमुळे होते, तर ओझोन थराची झीज मुख्यतः क्लोरोफ्लुरोकार्बनसारख्या रसायनांमुळे होते. त्यामुळे आपण जागरूकतेने पर्यावरणाची काळजी घ्यायला हवी. ओझोन थर हा फक्त आकाशातील वायूंचा थर नसून, पृथ्वीवरील सर्व सजीवांचे रक्षण करणारा एक अदृश्य संरक्षक आहे. आपण ओझोनची काळजी घेतली तर ओझोनही आपली काळजी घेईल हे नक्की.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१८ जुलै

१) श्रीम. सुमती प्रभाकर दांडेकर अलिबाग, १८-७-१९४९

२) श्रीम. सुहासिनी रोहिदास म्हात्रे अलिबाग, १८-७-१९४५

३) श्री. अरूण रघुनाथ भितळे गोंधळपाडा, वेश्वी, १८-७-१९५५

# भारतीयांसाठी आसीयान बाजारपेठ खुली

**इंडिया-थायलंड ग्लोबल व्हिजन कॉन्क्लेव्ह २०२६**

**| कोल्हापूर | प्रतिनिधी |**

कोल्हापूरातील ग्लोबल व्हिजन ट्रेड ऑर्गनायझेशन मार्फत, बँकॉक, थायलंड येथे नुकतेच पहिले 'इंडिया-थायलंड ग्लोबल व्हिजन कॉन्क्लेव्ह-२०२६' पार पडले. भारत-आसीयान-आफ्रिका विकास कॉरिडॉरमध्ये अर्थपूर्ण सीमापार भागीदारी घडवून आणण्यासाठी आशिया व अन्य खंडांतील उद्योजक आणि उद्योग क्षेत्रातील नेते या परिषदेत एकत्र आले होते.



या परिषदेला १३० प्रतिनिधी, ५० हून अधिक उद्योजकांसह दहा देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. कार्यक्रमावेळी आंतरराष्ट्रीय व्यापार व उद्योजक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल २५ मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

कोल्हापूरसाठी विशेष अभिमानास्पद गोष्ट अशी की, सीमेपलीकडे व्यापार विस्तार करण्यासाठी थायलंडसह इतर उत्पादन क्षेत्रातील कंपन्यांनी स्थानिक कोल्हापूरच्या एमआयडीसी क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यास स्वारस्य दर्शविले.

यासाठी परदेशी कंपन्यांशी सहाय्य करण्यास इच्छुक कंपन्यांनी परिषदेत सहभाग घेतला आणि प्राथमिक करार करण्यात आले. भारत-थायलंड आर्थिक संबंध दृढ करणाऱ्या उपक्रमाबद्दल भारताचे थायलंडमधील राजदूत महामहीम पुनीत अग्रवाल आणि भारतीय दूतावास, बँकॉक यांचे विशेष सहकार्य लाभले.

या परिषदेला थायलंडचे माजी उपपंतप्रधान महामहीम कॉर्न दब्बरांसी, इंटरनॅशनल ट्रेड कोर्टचे न्यायमूर्ती लुई लामा, थाई-इंडिया बिझनेस अलायन्सचे संस्थापक अध्यक्ष अजयन पॉल नरूला, इन्फॉर्मा मार्केट्सचे ग्रुप पोर्टफोलिओ संचालक फ्रेझर हॉक्स, पीपल्स रिफ्लेक्शन्सचे संचालक श्रीकांत घरत, जीव्हीटीओचे अध्यक्ष डॉ. अक्षय शिंदे आणि कंपनीचे मुख्य विपणन अधिकारी राहुल आर्य उपस्थित होते. प्रमुख पुरस्कारार्थींमध्ये भारत-आसीयान कॉरिडॉरमधील उत्पादक आणि पुरवठादार यांच्यातील साखळी सेवांमधील उत्कृष्टतेबद्दल बिपीन अगरवाल यांना Cross Border Trade Leadership Award, महिला उद्योजिका हिना मोतीवाला, कृषी व्यावसायिक श्रीकांत घरत, दस्तऐवज प्रक्रिया स्वयंचलनातील कार्याबद्दल अश्विनी मोईली, डिजिटल इनोव्हेशनमध्ये विवेक सिंग, तसेच १०,००० हून अधिक लेखकांचे डिजिटल व्यासपीठ उभारल्याबद्दल श्रीकांत घरत यांचा समावेश होता.

आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी भारतीय संस्थांना पाठबळ मिळावे, यासाठी वरिष्ठ राजनैतिक व शासकीय प्रतिनिधींचे सहकार्य उपलब्ध होणार असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. भारतीय कंपन्यांना जागतिक बाजारपेठांमध्ये विस्तारासाठी मोठ्या संधी उपलब्ध असून उत्पादक, निर्यातदार, आयातदार व संस्थात्मक गुंतवणूकदारांना जोडणारे आंतरराष्ट्रीय नेटवर्क तयार झाले आहे.

### संधीचा लाभ घेण्याचे आवाहन

**परिषदेत माजी उपपंतप्रधान कॉर्न दब्बरांसी यांनी, हे पुरस्कारार्थी म्हणजे भारत-आसीयान व्यापाराचे भविष्य आहेत. आज त्यांना आसीयानमधील खरेदीदार, भागीदार आणि गुंतवणूकदारांच्या नेटवर्कमध्ये प्रवेश मिळाला आहे, असे सांगून उद्योग विस्तारासाठी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले.**

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**विमल सॉ मिल उचेडे पेण मधुबन लेडीज वेल्फेअर असोसिएशन, किहीम कॉलनी,**

## प्रिया पवार यांचा सन्मान

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील रा.जि.प. शाळा संभे शाळेच्या मुख्याध्यापिका प्रिया आशिष पवार यांची शिक्षण विभागातील रोहा तालुक्यातील कुडली केंद्राच्या केंद्रप्रमुखपदी नुकतीच निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल संभे शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेच्या नवनिर्वाचित मुख्याध्यापिका रेश्मा जमादार, अंगणवाडी सेविका संगीता सानप तसेच राजश्री सानप यांनी नियोजन केले. यावेळी संजय सानप, अनंत सानप, पांडुरंग सानप, रमेश सानप, मनाली मनोहर सानप, जगन्नाथ मढवी, नितीन शेळके, विजया विजय सानप, दीप्ती सानप, तसेच शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा अनिता प्रशांत मालुसरे, उपाध्यक्ष रिया किजबिले तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रिया पवार यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी, पालकांनी आणि सहकाऱ्यांनी सत्कारमूर्ती यांच्या शिस्तप्रिय आणि मार्गदर्शक स्वभावाचे कौतुक केले.



## महिला सुरक्षा विषयावर सहविचार सभा

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

न्यू इंग्लिश स्कूल, म्हसळा येथे विद्यार्थी सुरक्षा, भौतिक विकास समिती, महिला तक्रार निवारण समिती व सखी समिती यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सुरक्षा आणि विद्यार्थी संरक्षण या विषयावर सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित, सुसंवादी व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरणाच्या दृष्टीने ही सभा अत्यंत उपयुक्त ठरली.




सभेमध्ये स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन समीर बनकर, प्रा. डी. आर. पाटील, समितीच्या अध्यक्षा तथा नगरसेविका जयश्री कापरे आणि डॉ. सोनाली करंबे यांनी विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती, शाळाबाह्य विद्यार्थ्यांचा शोध, शाळेतील भौतिक सुविधांचा विकास, सी. एस. आर. निधी उपलब्ध करण्याचे प्रयत्न, माजी विद्यार्थी संघटनांची भूमिका, विद्यार्थी सुरक्षा तक्रार निवारण कक्ष, तसेच विद्यार्थी लैंगिक शोषणास प्रतिबंध करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आदी विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली.

अध्यक्षीय मनोगतात चेअरमन समीर बनकर यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी पालक आणि शिक्षक यांची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. बदलापूर येथील घटनेचा संदर्भ देत अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी विद्यार्थिनींच्या समस्या शिक्षकांनी संवेदनशीलतेने जाणून घेऊन त्यांचे तातडीने निराकरण करणे गरजेचे असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## निवडक



### क्रेडीला फायनान्सकडून शैक्षणिक साहित्य

**नेरळ :** कर्जत तालुक्यात धामोते येथे असलेल्या नेरळ विद्या भवन शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. क्रेडीला फायनान्स या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांकडून हे साहित्य वाटप करण्यात आले. नेरळ विद्या भवन माध्यमिक विद्यालय धामोते या मराठी माध्यमाच्या शाळेत इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी लाईट ऑफ लाइफ ट्रस्ट गेल्या तीन वर्षांपासून माध्यमिक शाळा सक्षमीकरण करण्यासाठी आनंदो प्रकल्प चालवित आहे. या संस्थेच्या पुढाकारातून क्रेडीला फायनास या कंपनीच्या उत्तम सहकार्याने शाळेतील १३५ विद्यार्थ्यांना एक स्कूल बॅग, सहा वह्या, प्रत्येकी एक आलेखवही, चित्रकला वही, कंपास पेटी, पेन शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. तसेच समाजसेविका ज्योत्स्ना विरले यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दहावीनंतर पुढील उच्च व्यावसायिक शिक्षण घेण्यासाठी उज्वल भविष्यासाठी 'पाऊलवाटा करिअरच्या' हे मार्गदर्शनपर पुस्तक भेट दिले.

### नगराध्यक्ष चषकासाठी अलिबाग सज्ज

**रायगड :** अलिबाग येथील स्व.नमिता नाईक क्रीडा संकुल येथे रविवारी (दि.१९) ॲक्वाटिक असोसिएशन ऑफ रायगड व स्व.नमिता नाईक क्रीडा संकुल, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने नगराध्यक्ष चषक (अक्षया प्रशांत नाईक, नगराध्यक्षा अलिबाग) जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व युवा गुणवान जलतरणपटूंसाठी पर्वणी ठरणारी ही स्पर्धा ६ वर्षांपासून ते १६ वर्षाखालील वयोगटातील मुला-मुलींसाठी आणि खुल्या गटांतील महिला व पुरुष जलतरणपटूंसाठी आयोजित केली आहे.

**■ जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेचे आयोजन**

या स्पर्धेत जलतरण क्रीडा प्रकारातील फ्रीस्टाइल, बॅकस्ट्रोक, ब्रेस्टस्ट्रोक आणि बटरफ्लाय अशा वेगवेगळ्या प्रकारांचा समावेश असणार आहे.विविध वयोगटातील जलतरण स्पर्धा ही निश्चित केलेल्या वेळेनुसार घेतली जाणार असून विविध प्रकारच्या जलतरण इव्हेंट स्पर्धेसाठी सर्व जलतरणपटूंनी सकाळी ठीक ९ वाजता उपस्थित रहायचे आहे.स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना विविध जलतरण प्रकारात सहभाग घेता येणार आहे.प्रत्येक जलतरण प्रकारातील स्पर्धेत विजयी होणाऱ्या तीन खेळाडूंना मेडल्स व प्रमाणपत्र देण्यात येतील. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंनी आपली नोंदणी ऑनलाईन पद्धतीने https://forms.gle/bCgNqV2qiBPSgGJt5 ह्या गुगल लिंक द्वारे अथवा प्रत्यक्ष स्पर्धेच्या ठिकाणी करायची आहे. खेळाडूंनी आपली संपूर्ण माहिती भरणे तसेच आपल्या वयाचा पुरावा म्हणून आधारकार्ड, जन्म दाखला, पास पोर्ट साईज फोटो व स्पर्धा नोंदणी फी व खेळाडू कोणत्या प्रकारातील स्पर्धेत सहभाग घेणार आहे ह्याची माहिती देणे आवश्यक आहे. खेळाडूंना विविध प्रकारच्या जलतरण प्रकारात सहभाग घेता येणार असून त्यांनी तशी नोंदणी करायची आहे. रायगड जिल्ह्यातील जास्तीत जास्त जलतरणपटूंनी स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्षा अक्षया नाईक, गटनेते प्रशांत नाईक यांचे हस्ते होणार असून मुख्याधिकारी सागर साळुंखे,उपनगराध्यक्ष मानसी म्हात्रे सर्व नगरसेवक, नगरसेविका यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. स्पर्धे विषयी अधिक माहितीसाठी ८९८३८९५३०७/९५२२०३५०७५ ह्या नंबर वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### ब्रम्हचैतन्य मासिक संगीत सभा

**पनवेल :** श्री ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे ५६ वे पुष्प पनवेल येथे पार पडले. येथील ब्रह्मचैतन्य गोंदवेकर महाराज नामस्मरण केंद्रामधे झालेल्या या संगीत सभेत युवा शास्त्रीय गायिका सावनी शेवडे-भडसावळे यांनी आपली संगीत सेवा सादर केली. विदुषी शाल्मली जोशी यांच्या शिष्या असलेल्या सावनी शेवडे यांनी संगीत सभेची सुरुवात राग यमनने केली. त्यानंतर राग मुलतानीमध्ये द्रुत बंदिश सादर केली. पुढे संगीत रस सुरस, नरवर कृष्णासमान, निर्गुणाचे भेटी, दिनांची माऊली अजी म्या देखिली, श्रीरंगा कमलाकांता या नाट्यपद व अभंगांचे सादरीकरण केले. त्यानंतर आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा हा अभंग सादर करून श्रीराम नाम नौका भव सागरी तराया या गीताने संगीत सभेची सांगता केली.

## मोकाट कुत्र्यांचा वाढता उपद्रव

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

स्पेगेटी बसस्टॉप परिसरात मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर प्रवाशांसाठी गंभीर समस्या ठरत आहे. या बसस्टॉपवर दररोज हजारो प्रवासी बसची प्रतीक्षा करत असतात. मात्र, मोकाट कुत्र्यांच्या सातत्यपूर्ण वावरामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



बसस्टॉप परिसरात तसेच पादचारी पुलावर ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या अंगावर ही कुत्री अनेकदा धावून येत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून करण्यात येत आहेत. अचानक कुत्र्यांपासून बचाव करण्याच्या प्रयत्नात एखादा प्रवासी महामार्गावर गेल्यास भरधाव वाहनाची धडक होऊन गंभीर अपघात किंवा जीवितहानी होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. संध्याकाळच्या वेळी या परिसरात मोकाट कुत्र्यांचा वावर अधिक वाढत असल्याने महिला प्रवाशांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे बसची वाट पाहताना अनेकांना भीतीच्या छायेत उभे राहावे लागत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या स्वान पथकाने तातडीने या परिसराची पाहणी करून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा. तसेच, प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी प्रवासी आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## अनाथ मुलांसाठी समाजसेवेचा हात

**| म्हसळा | प्रतिनिधी |**

समाजसेवक जितेंद्र पाभरेकर व मित्र परिवाराने तडवळे येथील जीवन बालगृह अनाथालयास भेट दिली. त्यांनी तेथील निराधार, अनाथ तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील मुलांसाठी अन्नधान्य, कपडे, खाऊ आणि विविध जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. या सेवाभावी उपक्रमामुळे बालगृहातील मुलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. समाजातील गरजू आणि वंचित मुलांना आधार देण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. यावेळी बोलताना समाजसेवक जितेंद्र पाभरेकर म्हणाले, 'दान हे संपत्तीने नव्हे, तर मनाने मोठे असते.' या भावनेतून हे सेवाकार्य करण्यात आले असून समाजातील गरजू व्यक्ती आणि मुलांच्या आयुष्यात आनंदाचे काही क्षण निर्माण करण्याचा हा छोटासा प्रयत्न आहे.



अशा सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळणे ही समाधानाची आणि प्रेरणादायी बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, भविष्यातही विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सेवाभावी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत समाजाप्रती आपली बांधिलकी जपण्याचा संकल्प जितेंद्र पाभरेकर यांनी व्यक्त केला.



## रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन

**| पनवेल ग्रामीण | प्रतिनिधी |**

जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त बुधवारी (दि.१५) पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. हा मेळावा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगडअलिबाग आणि डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ फार्मसी अँड रिसर्च सेंटर, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थिती मान्यवरांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकास, रोजगाराच्या संधी, अप्रेंटिसशिप तसेच उद्योजकतेचे महत्त्व याविषयी मार्गदर्शन केले. या मेळाव्यात मॅन्युफॅक्चरिंग, औषधनिर्माण, पॅकेजिंग, ऑटोमोबाईल, मानव संसाधन तसेच इतर विविध औद्योगिक क्षेत्रांतील उद्योग-आस्थापनांनी सहभाग नोंदविला. २८० विद्यार्थी व युवकांनी या मेळाव्याचा लाभ घेतला.

## पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**■ सह्याद्री प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम**

**| खरोशी | प्रतिनिधी |**

सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या पेणमधील सभासदांनी तालुक्यातील दुरशेत आणि खरोशी या पूरग्रस्त भागात जाऊन त्यांना जीवनावश्यक अन्नधान्याचे साहित्य वाटप केले.



आठ दिवसांपूर्वी रायगड जिल्ह्यात पडलेल्या मुसळधार पावसात पेण तालुक्यातील अनेक गावांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. त्या पूरग्रस्त गावांमध्ये दुरशेत आणि खरोशी या गावांचा देखील समावेश होता. या गावांमधील जवळपास सत्तर टक्के नागरिकांच्या घरामध्ये पुराचे पाणी शिरून घरातील अनेक वस्तूंसह दैनंदिन जीवनासाठी लागणारे अन्नधान्याचे काही सामान देखील पुरामध्ये वाहून गेले. तर अनेक प्रकारचे अन्नधान्य भिजल्यामुळे या नागरिकांचे अतोनात हाल झाले होते. या प्रकारानंतर शासनाचे पंचनामे सुरू असले तरी ते कधी पूर्ण होतील आणि त्यांना मदत कधी होईल याची साशंकता असल्याने सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या शेकडो मावळ्यांनी तालुक्यातील दुरशेत आणि खरोशी गावात जाऊन जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. यामध्ये कांदे, बटाटे, तेल, मसाले, मीठ, तांदूळ, खोबरे, लसुण, हळद, डाळी आदी जेवणासाठी लागणाऱ्या वस्तूंचे वाटप केले.

## विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**पनवेल ग्रामीण :** वैश्य ग्लोबल चॅरिटेबल ट्रस्ट व रायगड जिल्हा वैश्य युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हास्तरीय विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६चे आयोजन रविवार २६ जुलै रोजी ज्येष्ठ नागरिक संघ हॉल ठाणे नाका, पनवेल येथे सकाळी ११ वाजता करण्यात आले आहे. मनोज महादेव आंग्रे मा. अध्यक्ष रायगड जिल्हा वैश्य युवक संघ, माजी रायगड जिल्हा शिक्षण समिती पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम होणार आहे. रायगड जिल्ह्यातील वैश्यवाणी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशाचा सन्मान करण्यासाठी हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

**केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृती | युवा प्रतिष्ठानच्या तरुणांचा आदर्श**

# गोठे गावात ९०० झाडांची रुजवात

**| मुंबई | प्रतिनिधी |**

जलसंकटावर मात करण्यासाठी आणि ग्रामीण पर्यावरणाचा ढासळत चाललेला समतोल सावरण्यासाठी केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीचा एक आदर्श गोठे गावातील युवकांनी संपूर्ण परिसरासमोर घालून दिला आहे. युवा प्रतिष्ठान, गोठेगाव यांच्या पुढाकारातून हा विशेष उपक्रम स्थानिक ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागातून पार पडला.



एक दिवस गावासाठी या भावनेतून मुंबई व उपनगरांमध्ये नोकरी-धंद्यासाठी स्थायिक झालेले ६० हून अधिक चाकरमानी तरुण एकत्र आले होते. गोठे गावाची भौगोलिक रचना डोंगराळ असल्याने पावसाळ्यात येथे भरपूर पाऊस पडूनही तीव्र उतारामुळे पाणी वेगाने वाहून जाते, परिणामी उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण होते. ही भौगोलिक अडचण ओळखून गेल्या सलग सहा वर्षांपासून गावात वृक्षारोपण आणि पाणी अडवा, पाणी जिरवा ही मोहीम अविरतपणे राबवली जात आहे.

या मोहिमेत कामाचे अतिशय नियोजनबद्ध तीन स्वतंत्र गट पाडण्यात आले होते. पहिल्या गटाने कठीण स्थानिक प्रजातींच्या रोपांची नवीन खड्ड्यांमध्ये लागवड केली. दुसऱ्या गटाने गेल्या वर्षी लावलेल्या झाडांच्या बुंध्यापाशी मातीची भर देऊन त्यांना मजबूत केले. तर तिसऱ्या गटाने जुन्या खड्ड्यांतील गाळ काढून, नवीन खड्डे खोदून बाजूला दगडी बांध घातल.

### पाणीटंचाई, वणव्यांपासून कायमचा दिलासा

गेल्या ६ वर्षांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ९०० हून अधिक झाडांची यशस्वी रुजवात झाली आहे. त्यातील तब्बल ८० टक्के झाडे आज जिवंत आहेत आणि वणव्यांपासून सुरक्षित राहून जोमाने वाढत आहेत. या जलसंधारणाच्या कामामुळे गावाच्या मुख्य सखल भागातील पाण्याचे मुख्य नैसर्गिक झरे आता पुन्हा जिवंत झाले आहेत. भूगर्भातील ओलावा वाढल्यामुळे ग्रामीण भागाला उन्हाळ्यात भेडसावणाऱ्या स्थानिक वणव्यांच्या तीव्रतेवर नियंत्रण मिळवणे शक्य झाले असून, उन्हाळ्यातील भीषण पाणीटंचाई दूर झाल्याने गावकऱ्यांची पाण्याची चिंता कायमची मिटली आहे.

> "गावागावांतील युवकांनी वृक्षारोपण आणि जलसंधारणाचे असे उपक्रम हाती घेतल्यास पाणीटंचाई व उन्हाळ्यातील वणव्यांच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात करता येईल. वणव्यांपासून झाडे वाचवणे आणि पाणी जिरवणे ही काळाची गरज आहे. सर्वांनी एकी हेच बळ या उक्तीचा प्रत्यय गोठे गावातील या उपक्रमातून दिला."
>
> -विनोद भुवड
> (अध्यक्ष, युवा प्रतिष्ठान)

### जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे:

**मौजे बारशिव, ता.मुरूड, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत.**

| मौजे | गट क्र./उपविभाग | क्षेत्र एकक हे.आर.चौ.मी. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| बारशिव | १६९ | १.२९.०० | १.४१ |

येणेप्रमाणे वर्णनाचे मिळकत त्यात असलेला झाड झाडोरा, वहिवाटीचे हक्क, कुंपण, शेतघर, वगैरे सह अशा मिळकती बाबत सदरहू मिळकतीचे विद्यमान मालक श्री. राजेश मनोहर महाडीक, मु.बारशिव, ता.मुरूड, जि.रायगड यांनी संदर्भित मिळकत त्यांचे मालकी हक्काची व कब्जे वहीवाटीची व निर्वेध असल्याचा भरवसा माझे आशिल यांस दिला आहे. माझे आशिल यांनी श्री. राजेश मनोहर महाडीक यांचे सदरहू मिळकती वरील मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. सबब, याउपरही सदर मिळकतीत कोणाचाही गहाण, बक्षीस, साठेकरार, दान, फरोक्त, कब्जा, वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात, नोटरी सत्यप्रती व कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांजकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ६ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख १८.०७.२०२६

**(ॲड. एस.वाय.बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)